शुक्रवार, १६ डिसेंबर २०२२
# राम प्रहर
◆ वर्ष १५ ◆ अंक १४८
www.ramprahar.com
◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## भारताकडून अग्नी-५ क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी

**नवी दिल्ली** : भारताने गुरुवारी (दि. १५) अग्नी-५ या बॅलिस्टिक क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी घेतली.



या मिसाईलचे वैशिष्ट्य म्हणजे रात्रीच्या वेळीही पाच हजार किलोमीटरपर्यंतचे लक्ष्य भेदता येणार आहे. मागील अनेक वर्षांपासून 'अग्नी-५'साठी भारताचे प्रयत्न सुरू होते. सुरुवातीला २०१२मध्ये या मिसाईलचे परीक्षण झाले होते. यशस्वी चाचणी झाल्याने भारताचे बळ वाढले आहे. ९ डिसेंबर रोजी चिनी सैन्याने अरुणाचल प्रदेशातील तवांग सेक्टरमध्ये घुसखोरी केली होती. भारतीय सैन्याने चोख प्रत्युत्तर दिल्याने चिनी सैन्य पाठीला पाय लावून पळाले. अशाच कुरबुरी पाकिस्तानकडूनही सुरू असतात. त्या पार्श्वभूमीवर अग्नी-५ क्षेपणास्त्र महत्त्वाचे मानले जात आहे. चीन आणि पाकिस्तानसह अर्ध्या जगावर हल्ला करू शकणाऱ्या या क्षेपणास्त्रामुळे भारताचे वेगळे स्थान निर्माण झाले आहे.

**अंतरंग**

निवडणूक असलेल्या ग्रामपंचायत हद्दीत मनाई आदेश जारी/२

उसर्ली खुर्दच्या माजी सरपंचांवर अटकेची टांगती तलवार/३

फीफा वर्ल्डकप : मोरोक्कोला नमवून फ्रान्स फायनलमध्ये/८

### राज्यातील शेतकऱ्यांना सरकारचा मोठा दिलासा

# अतिवृष्टीच्या नुकसानभरपाईत दुपटीने वाढ

**मुंबई : प्रतिनिधी**

अतिवृष्टी, अवकाळी पाऊस अशा दुष्टचक्रात सापडलेल्या राज्यातील शेतकऱ्यांना शिंदे-फडणवीस सरकारने पुन्हा एकदा दिलासा दिला आहे. अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या नुकसानभरपाईच्या रकमेत प्रति हेक्टर दुपटीने वाढ करण्यात आली आहे.



राज्यात झालेल्या अतिवृष्टी आणि पूर परिस्थितीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे आणि शेतजमिनींचे मोठे नुकसान झाले होते. बाधित शेतकऱ्यांना राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून पिके आणि शेतजमिनीच्या नुकसानीसाठी २२२३२.४५ लाख रुपये इतका निधी वितरीत करण्यास सरकारने मंजुरी दिली आहे. येत्या हिवाळी अधिवेशनात या निधीची तरतूद पुरवणी मागण्यांद्वारे करण्यात येईल. त्यानुसार हा निधी विभागीय आयुक्तांना किंवा शासनाचे आदेश येतील त्याप्रमाणे वितरित करण्याचे आदेश दिले जाणार आहेत.

जून ते ऑक्टोबर २०२२ या कालावधीत अतिवृष्टी आणि पुरामुळे राज्यातील विविध जिल्ह्यांत झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीसाठी वाढीव दराने मदत देण्याबाबत महसूल विभागाने शासन निर्णय घेतला आहे. यामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

शासन निर्णयात म्हटले आहे की, पंचनामे करण्यात आल्यानंतर लाभार्थी निश्चित करण्यात यावेत. या शासन निर्णयानुसार संपूर्ण रक्कम बीम्स प्रणालीवर वितरीत करण्यात येत असली तरी लाभार्थी निश्चित झाल्यानंतर वित्तीय शिस्तीच्या दृष्टिकोनातून संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष गरजेनुसार कोषागारातून रक्कम आहरित करून त्यानंतरच शासन निश्चित करेल अशा पद्धतीने लाभार्थ्यांच्या थेट बँक खात्यामध्ये ऑनलाईन पद्धतीने रक्कम हस्तांतरीत करावी.

### अशी मिळणार मदत

महसूल व वन विभागाने हा निर्णय जाहीर केला आहे. त्यानुसार जिरायत पिकाच्या नुकसानीसाठी सहा हजार ८०० रुपयांऐवजी आता १३ हजार ६०० रुपये, बागायत पिकाच्या नुकसानीसाठी १३ हजार ५००ऐवजी आता २७ हजार रुपये मिळणार आहेत. याशिवाय बहुवार्षिक पिकाच्या नुकसानीसाठी १८ हजारऐवजी आता मिळणार ३६ हजार रुपये मिळणार आहेत. सरकारने नुकसानीची मर्यादाही वाढवली आहे. दोन हेक्टरऐवजी तीन हेक्टरपर्यंत मदत मिळणार आहे.

(छाया : अक्षय शार्दुल)



# गावचे भविष्य घडविण्यासाठी विचार करून मतदान करा

### आमदार महेश बालदी यांचे प्रतिपादन; भाताणमध्ये रॅली, सभा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ग्रामपंचायत निवडणूक ही आपल्या गावचे भविष्य घडविणारी निवडणूक असते. त्यामुळे कर्नाळा बँक बुडविणाऱ्यांच्या तसेच लोकनेते दिवंगत दि. बा. पाटील यांचे नाव नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला न देणाऱ्यांच्या मागे आपण राहणार आहोत की, जगात देशाचे नाव उज्ज्वल करणाऱ्या आणि विविध योजना, निर्णय, उपक्रमांद्वारे सर्वसामान्य नागरिकांना सोयीसुविधा देणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मागे आपण उभे राहणार आहोत याचा विचार करून मतदान करा, असे प्रतिपादन उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी यांनी बुधवारी (दि. १४) भाताण येथे केले. ते जाहीर सभेत बोलत होते.



ग्रामपंचायत निवडणुकीचा उत्साह आता शिगेला पोहचला आहे. भाताण ग्रामपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप आणि मनसे युती उमेदवारांच्या प्रचारार्थ बुधवारी प्रचार रॅली काढण्यात आली होती. या प्रचार रॅलीला मतदारांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. रॅलीनंतर आमदार महेश बालदी आणि पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या उपस्थितीत सभा झाली. या वेळी आमदार महेश बालदी यांनी विरोधकांचा समाचार घेत या निवडणुकीत विजय आपलाच होईल, असा विश्वास व्यक्त केला.

बाळाराम पाटील यांच्या आमदारकीचे आठ महिने शिल्लक राहिले आहेत. त्यानंतर त्यांचा दिवा पेटेल असं मला वाटत नाही किंबहुना हा दिवा पेटणार नाही याची तयारी आम्ही केली असून यामध्ये नक्की यशस्वी होणार आहोत. महाविकास आघाडीची सत्ता आल्यानंतर निधी कुठून देणार? ना त्यांचा आमदार, ना खासदार तसेच केंद्रात आणि राज्यातही यांची सत्ता नाही. जर यांच्याकडे निधी उपलब्ध करून देण्याचा कोणताही स्रोत उपलब्ध नाही. मग यांची ग्रामपंचायतीमध्ये सत्ता आल्यानंतर निधी कुठून उपलब्ध करून देणार, असा असा सवाल या वेळी आमदार महेश बालदी यांनी उपस्थित केला.

पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भाताण ग्रामपंचायतीवर भाजप-मनसे युतीचा झेंडा फडकल्यास गावचा विकास नक्की होईल, असा विश्वास व्यक्त केला. **(पान २ वर..)**

## मुंबईतील कोस्टल रोड वादावर तोडगा

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईतील कोस्टल रोड प्रकल्पात दोन पीलरमधील अंतर ६० मीटरऐवजी आता १२० मीटर इतके असणार आहे. याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरुवारी (दि. १५) प्रसारमाध्यमांशी बोलताना दिली. या वेळी स्थानिक कोळी बांधवांच्या समितीचे सदस्यदेखील उपस्थित होते.

प्रकल्पबाधित असलेल्या कोळी समाजाने सुरुवातीपासूनच कोस्टल प्रकल्पात बांधल्या जाणाऱ्या खांबांपैकी दोन खांबांमधील अंतर हे १२० मीटर असावे अशी मागणी लावून धरली होती. ही मागणी मान्य करण्यात आल्याने या वेळी प्रकल्पग्रस्त बांधवांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार व्यक्त केले तसेच दोन्ही नेत्यांना कोळी महोत्सवाला येण्याचे निमंत्रणही दिले.

कोस्टल रोड शहरासाठी महत्त्वाचा पायाभूत प्रकल्प असला तरी हे सरकार भूमिपुत्रांचे सरकार आहे. ज्या ठिकाणी प्रकल्प राबवतोय तिथे लोकांवर अन्याय होऊ नये अशी बाळासाहेबांचीही भूमिका राहिली आहे. प्रकल्पाचे काम ७० टक्के पूर्ण झाल्याने अडचण निर्माण झाली होती, पण स्थानिकांचे प्रश्न सोडवूनच पुढे जाता येईल अशी आमची भूमिका आहे. त्यामुळे आम्ही कोस्टल रोडमधील दोन पिलरचे अंतर १२० मीटर करण्याचा निर्णय घेतला आहे, जेणेकरून मच्छीमारांच्या बोटी सहजपणे समुद्रात ये-जा करु शकतील, असे मुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

## नीरव मोदीला भारतात आणण्याचा मार्ग मोकळा



**नवी दिल्ली** : पंजाब नॅशनल बँक घोटाळा प्रकरणात भारतातून फरार झालेला हिरे व्यापारी निरव मोदीला आता भारतात परत यावेच लागेल, कारण ब्रिटनच्या सर्वोच्च न्यायालयामध्ये प्रत्यार्पणाच्या विरोधात अपील करण्याची शेवटची संधीही गमावली आहे.

घोटाळा करून फरार झालेल्या नीरव मोदीला भारताच्या ताब्यात देण्यात यावे यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात होते. न्यायालयातही भारताकडून बाजू मांडण्यात येत होती. त्या विरोधात नीरवने याचिका दाखल केली होती, मात्र कोर्टाने ही याचिका फेटाळून लावली. त्यामुळे लंडनमधील तुरुंगात असलेल्या नीरवच्या मुसक्या आवळून त्याला भारतात आणण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

## निवडक

### आयएनएस 'विक्रांत'प्रकरणी सोमय्या पिता-पुत्रांना क्लीन चिट

**मुंबई** : युद्धनौका आयएनएस विक्रांत निधी अपहार आरोप प्रकरणात भाजप नेते माजी खासदार किरीट सोमय्या आणि त्यांचा मुलगा नील सोमय्या यांना दिलासा मिळाला आहे. मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने सोमय्या पिता-पुत्रांना क्लीन चिट दिली आहे. त्यांच्याविरोधात कोणतेही ठोस पुरावे सापडले नसल्याची कबुली पोलिसांनी न्यायालयात दिली.

### अभिनेत्री वीणा कपूर जिवंत; हत्या झालेल्या 'त्या' नाहीत

**मुंबई** : संपत्तीसाठी टीव्ही अभिनेत्री वीणा कपूर यांची त्यांच्याच मुलाने हत्या केल्याचे वृत्त पसरले होते, पण या अभिनेत्रीने स्वतः आपण जिवंत असल्याची माहिती दिली असून बदनामीप्रकरणी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. हत्या करून माथेरानच्या जंगलात टाकलेल्या महिलेचे नावही विणा कपूर असल्याने हा गोंधळ उडाल्याचे समोर आले आहे.



# आरसीएफचा विस्तारीत प्रकल्प थळ येथेच होणार -पालकमंत्री

**अलिबाग : प्रतिनिधी**

राष्ट्रीय केमिकल्स अ‍ॅण्ड फर्टीलायझर्सचा (आरसीएफ) विस्तारीत प्रकल्प थळ येथेच होणार आहे. हा प्रकल्प अन्य राज्यात जाणार नाही. लवकरच या प्रकल्पाची जनसुनावणी घेण्यात येईल, अशी माहिती राज्याचे उद्योगमंत्री तथा रायगडचे पालकमंत्री उदय सामंत यांनी गुरुवारी (दि. १५) येथे दिली.

पालकमंत्री उदय सामंत जिल्हास्तरीय आढावा बैठक घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात आले होते. बैठक संपल्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते. आमदार महेंद्र दळवी, जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. पद्मश्री बैनाडे उपस्थित होते.



(छाया : जितू शिगवण)

आरसीएफच्या पीआर/पीएन तंत्रज्ञानावर आधारित नवीन १२०० एमटीपीडी (डीएपी आधार) एनपीके/डीएपी कॉम्प्लेक्स फर्टिलायझर प्लांट उभारण्याच्या विस्तारीत प्रकल्पाची पर्यावरणविषयक जनसुनावणी १५ नोव्हेंबर रोजी अलिबाग तालुक्यातील चोंढी येथील हॉटेल साई-इन येथे आयोजित करण्यात आली होती, परंतु स्थानिकांचा विरोध असून सुनावणीदरम्यान कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊन शकतो असे म्हणून ही सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती.

याबाबत राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांना विचारण्यात आले असता त्यांनी सांगितले की, आरसीएफ प्रकल्पातील १४० प्रकल्पग्रस्तांच्या नोकरीचा प्रश्न अजून सुटलेला नाही. हा प्रश्न प्रथम सोडवावा व नंतर विस्तारीत प्रकल्प आणावा असे स्थानिकांचे म्हणणे होते. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून जनसुनावणी पुढे ढकलण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला.

आरसीएफच्या १४० प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नांबाबत मुख्यमंत्र्यांशी चर्चा झाली. केंद्रीय रसायनमंत्र्यांशी याबाबत चर्चा करण्यात आली आहे. १४० प्रकल्पग्रस्तांचा प्रश्न सुटेल, असे मंत्री सामंत यांनी सांगितले.

जनसुनावणी रद्द झाल्यामुळे आरसीएफचा विस्तारीत प्रकल्प अन्य राज्यात जाऊ शकतो असे चुकीच्या माहितीवर सांगितले जात आहे. लवकरच आरसीएफच्या विस्तारीत प्रकल्पाची जनसुनावणी घेण्यात येईल. विस्तारीत प्रकल्प अन्य राज्यात जाणार नाही. हा प्रकल्प आरसीएफच्या थळ प्रकल्पाच्या परिसरातच होईल, असे ना. सामंत यांनी स्पष्ट केले.

### रायगडात भव्य रोजगार मेळावा

उद्योग विभागामार्फत २० फेब्रुवारी २०२३ रोजी रायगड जिल्ह्यात भव्य रोजगार मेळावा घेणार आहे. यात जिल्ह्यातील कंपन्यांबरोबरच देशातील तसेच परदेशातील कंपन्यांचा सहभाग असणार आहे. स्थानिकांना जास्तीत जास्त रोजगार मिळावा यासाठीचे प्रयत्न या मेळाव्याच्या माध्यमातून केले जाणार असल्याची माहिती राज्याचे उद्योगमंत्री तथा रायगडचे पालकमंत्री उदय सामंत यांनी या वेळी दिली.

## महाडमध्ये विवाहितेवर अत्याचार; गुन्हा दाखल

**महाड : प्रतिनिधी**

महाड तालुक्यातील कोथेरी येथील एका विवाहित महिलेवर बलात्कार करीत मोबाईलमध्ये चित्रण करून ते व्हायरल करण्याची धमकी देत वारंवार अत्याचाराची घटना घडली. या प्रकरणी तीन आरोपींविरोधात महाड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपी काशिनाथ हा फिर्यादी पीडित महिलेच्या घरी आला आणि त्याने कागदाच्या पुडीत आणलेली पावडर पीडितेच्या आजारी पतीला पाण्यातून दिली. यामुळे त्याला गुंगी आली. या वेळी आरोपीने पीडितेवर अत्याचार केला आणि त्याचे व्हिडिओ आणि फोटो काढत व्हायरल करण्याची धमकी देत वारंवार अत्याचार केला तसेच तिच्याकडून सुमारे १२ लाख रुपये धमकी देऊन घेतले. या प्रकरणी पोलिसांकडून अधिक तपास सुरू आहे.

**(सविस्तर वृत्त पान २ वर..)**

# आयआयएचटी संस्थेचा वर्धापन दिन उत्साहात

### मंत्री रवींद्र चव्हाण, आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खारघर आणि वाशी येथील आयआयएचटी संस्थेला १० वर्ष पूर्ण झाली आहेत. त्यानिमित्त खारघर सेक्टर ३मधील एसएन पार्क येथे संस्थेच्या दशकपूर्ती वर्धापन दिनाचा कार्यक्रम बुधवारी (दि. १४) आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण आणि भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

आयआयएचटी खारघर आणि वाशी या संस्थेने गेल्या १० वर्षांत येथील १०हजारहून अधिक विद्यार्थ्यांना प्रशिक्षित केले असून पाच हजारांपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना प्लेसमेंट मिळवून दिले आहे. या संस्थेत प्रशिक्षणासह विद्यार्थ्यांना नोकरीची हमीदेखील देण्यात येते. अशा या संस्थेने यशस्वी दशकपूर्ती केली आहे. त्यामुळे वर्धापन दिनाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा झाला.

या दिनाचे औचित्य साधून संस्थेचे ऑल इंडिया ऑफ इंटीग्रेटेड टेक्निकल स्टडीसझ् अर्थात एआयआयआयटीएस हे नामकरण मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते या वेळी करण्यात आले. त्यांनी संस्थेला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाला पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक हरेश केणी, शत्रुघ्न काकडे, नरेश ठाकूर, भाजपचे खारघर शहर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, समीर कदम, गीता चौधरी यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, संस्थेचे सदस्य उपस्थित होते.

## विजेच्या धक्क्याने पुण्यात चौघांचा मृत्यू

**पुणे : प्रतिनिधी**

विजेच्या धक्क्याने बाप-लेकासह चार जणांचा जागीच मृत्यू झाल्याची घटना गुरुवारी (दि. १५) पुणे जिल्ह्याच्या भोर तालुक्यातील निगडी गावात घडली. नदीच्या पाण्यात मोटार सोडत असताना शॉक लागून चौघांचा जीव गेला.

राजगड पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार निगडे गावच्या हद्दीत गुंजवणी नदीच्या पाण्यात बंधाऱ्याच्या बॅकवॉटरमध्ये विठ्ठल मालुसरे यांची पाण्याची मोटार टाकण्याचे काम सुरू होते. त्यासाठी चार जण मोटार घेऊन पाण्यात ढकलत होते. त्या वेळी पाण्यात विजेचा प्रवाह आल्याने चौघांचाही जागीच मृत्यू झाला.

मृतांमध्ये विठ्ठल सुदाम मालुसरे (४५), सनी विठ्ठल मालुसरे (२६), अमोल चंद्रकांत मालुसरे (३६) आणि आनंदा ज्ञानेश्वर जाधव (५५, सर्व रा. निगडे) यांचा समावेश आहे. शेजारी शेतात काम करीत असलेल्या शेतकऱ्यांच्या लक्षात ही गोष्ट आल्यानंतर त्यांनी आरडाओरडा वीजप्रवाह बंद केला, मात्र तोवर उशीर झाला होता.

## वारकरी संप्रदायाच्या भावना दुखावणाऱ्या सुषमा अंधारेंवर काय कारवाई करणार?

### भाजप नेते आशिष शेलार यांचा उद्धव ठाकरेंना सवाल

**मुंबई : प्रतिनिधी**

वारकरी संप्रदायाच्या भावना दुखावणाऱ्या सुषमा अंधारे यांच्यावर उद्धव ठाकरे काय कारवाई करणार, असा सवाल भाजपचे नेते आमदार आशिष शेलार यांनी केला आहे.



शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांच्या अडचणीत वाढ होताना दिसत आहे. अंधारेंनी हिंदू देवी-देवता आणि साधू-संतांबद्दल केलेल्या आक्षेपार्ह वक्तव्यांचे व्हिडीओ व्हायरल होत असून यावरून महाराष्ट्र राज्य वारकरी महामंडळ आक्रमक झाला आहे. वारकरी महामंडळाकडून अंधारेंविरोधात तक्रारदेखील दाखल करण्यात आहे. याशिवाय भाजपनेही यावरून उद्धव ठाकरे यांच्यावर टीका सुरू केली आहे.

याच पार्श्वभूमीवर भाजपचे मुंबई अध्यक्ष आमदार आशिष शेलार म्हणाले की, उद्धव ठाकरेंनी ज्या पद्धतीने हिंदुत्व सोडले, बाळासाहेबांचे विचार सोडले आणि मग त्यांना जे जे लोकप्रिय होऊ लागले त्यामध्ये सुरुवातीला काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, समाजवादी पक्ष, कम्युनिस्ट तसेच हिंदुत्वविरोधी असलेल्या सुषमा अंधारे या त्यांना जवळच्या वाटायला लागल्या. त्यामुळे आमचा सवाल उद्धव ठाकरे आणि त्यांच्या शिवसेनेला आहे की तुम्ही सुषमा अंधारेंची हकालपट्टी करणार का? सुषमा अंधारेंवर कारवाई करणार का? सुषमा अंधारेंकडून या सगळ्या प्रकरणात वेगवेगळ्या समाजमाध्यमांवर जी वक्तव्ये हिंदू धर्मास दुखावणारी आली आहेत त्याबाबत काय भूमिका घेणार आहात? उद्धव ठाकरेंनी भूमिका स्पष्ट करावी, अशी आमची त्यांना विनंती आहे.

# मुंबई ते सॅनफ्रान्सिस्को विमानसेवेचा शुभारंभ

## सिलिकॉन व्हॅली महाराष्ट्राच्या आयटी क्षेत्राला जोडणार -मुख्यमंत्री

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई ते सॅनफ्रान्सिस्को थेट विमानसेवेमुळे महाराष्ट्रातील औद्योगिक आणि पर्यटन क्षेत्राला चालना मिळणार आहे. थेट सेवेमुळे अमेरिकेतील सिलिकॉन व्हॅली मुंबई, पुणे शहराला जोडली जाणार असून त्याचा महाराष्ट्रातील माहिती तंत्रज्ञान क्षेत्राला मोठा लाभ होईल, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरुवारी (दि. १५) येथे सांगितले.

एअर इंडियाच्या मुंबई ते सॅनफ्रान्सिस्को थेट विमानसेवेचा शुभारंभ केंद्रीय नागरी विमान उड्डाण मंत्री ज्योतिरादित्य सिंदीया यांच्या हस्ते करण्यात आले. या सोहळ्यात राज्याचे मुख्यमंत्री शिंदे दूरदृष्यप्रणालीच्या माध्यमातून सहभागी झाले होते. केंद्रीय नागरी विमान उड्डाण विभागाचे सचिव राजीव बन्सल, एअर इंडियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी कॅम्बेल विल्सन आदी या वेळी उपस्थित होते.



मुख्यमंत्री शिंदे या वेळी म्हणाले, मुंबई येथून सुरू झालेली ही थेट सेवा आतापर्यंतची सर्वांत लांब अंतराचा हवाई प्रवास आहे. आठवड्यातून तीन वेळेला ही सेवा असून त्यानंतर ती दररोज सुरू होईल, असा विश्वास व्यक्त केला. सॅनफ्रान्सिस्को आर्थिक आणि सांस्कृतिक केंद्र असून भारतीय पर्यटकांना थेट सेवा फायदेशीर ठरणार आहे. पर्यटनाला चालना देण्यासाठी ही थेटसेवा महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. कोरोनानंतर आता आंतरराष्ट्रीय प्रवासात वाढ झाली आहे. मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून २४ तासांत दिड लाख प्रवासी प्रवास करतात. मुंबईसह महाराष्ट्रातील लाखो लोक अमेरिकेत स्थायिक असून या सगळ्यांचे हवाईसेवेच्या माध्यमातून जोडणाऱ्या एअर इंडियाशी वेगळ नाते निर्माण झाले आहे, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

नुकतेच आम्ही राज्यात ७० हजार कोटींच्या गुंतवणुकीच्या प्रकल्पांना मंजुरी दिली असून विमानतळ विस्ताराला प्राधान्य दिले आहे. राज्यात प्रत्येक तालुक्यात हेलिपॅड करणार असून त्या माध्यमातून हवाईसेवा जोडण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

केंद्रीय मंत्री सिंदिया यांनी मराठीतून भाषणाला सुरुवात केली. मुंबई आणि सॅनफ्रान्सिस्कोशी असलेल्या भावनिक नात्याची आठवण त्यांनी सांगितली. हवाईसेवेच्या क्षेत्रात भारतात मोठ्या प्रमाणावर परिवर्तन होत असल्याचे सांगत जगात भारत हे नागरी हवाई उड्डाण क्षेत्रातील तिसऱ्या क्रमांकाचा देश असून हवाईप्रवास सेवेला अधिक बळ देण्याचे काम सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. या वेळी मुंबई विमानतळावर विल्सन यांच्या हस्ते प्रवाशांना बोर्डींग पासचे वितरण करण्यात आले.

# निवडणूक होत असलेल्या ग्रामपंचायत हद्दीत मनाई आदेश जारी

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

ऑक्टोबर २०२२ ते डिसेंबर २०२२ या कालावधीत मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायती, नव्याने स्थापित तसेच समर्पित आयोगाच्या अहवालात दिसत नसल्यामुळे मागील निवडणुकांमधून वगळलेल्या ग्रामपंचायतींची सार्वत्रिक निवडणूक १८ डिसेंबरला होणार आहे. यामुळे राज्य निवडणूक आयोगाने ९ नोव्हेंबरपासून आचारसंहिता अमलात आली आहे.

नवी मुंबई पोलीस आयुक्तालय हद्दीत, परिमंडळ २मधील पनवेल तहसील विभागातील पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीत चिंध्रण, भाताण, कानपोली, केळवणे, नेरे, दिघाटी पनवेल शहर पोलीस ठाणे हद्दीत शिरढोण, शिवकर, करंजाडे, तळोजा पोलीस ठाणे हद्दीत नितळस ग्रामपंचायत तसेच उरण तहसील विभागातील उरण पोलीस ठाण्याच्या हद्दीत राणसई, पुनाडे, सारडे, नवीन शेवा, धुतूम, कळंबुसरे, बोकडविरा, वशेणी, पागोटे, पिरकोन, चिलें, भेंडखळ, नवघर न्हावाशेवा पोलीस ठाण्याच्या हद्दीत पाणजे, डोंगरी, करळ, जसखार, मोरासागरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत घारापुरी या एकूण २८ ग्रामपंचायतीमधील निवडणूका होणार असून १८ डिसेंबर रोजी मतदान व २० डिसेंबर २०२२ रोजी मतमोजणी होणार आहे.

मतमोजणी तहसील कार्यालय, पनवेल तसेच सिडको ट्रेनिंग सेंटर, बोकडविरा, सेक्टर नं.३०, उरण येथे होणार आहे. वरील नमूद ठिकाणी मतपेट्या वाटप करण्यात येणार असून मतदान झाल्यानंतर मतपेट्या स्ट्राँगरुममध्ये ठेवण्यात येणार आहेत.

त्यामुळे मतदान केंद्रापासून १०० मीटरच्या आतील परिसरात मोबाईल फोन, पेजर, कॉडलेस फोन इतर इलेक्ट्रॉनिक वस्तू इ. नेण्यास प्रतिबंध जाहीर केला आहे. या आदेशाचा भंग करणाऱ्या इसमांविरुद्ध भादंविक १८८प्रमाणे कारवाई केली जाईल, असे पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा नवी मुंबई प्रशांत मोहिते यांनी कळविले आहे, तसेच आदेशाच्या प्रती परिमंडळ २मधील पनवेल शहर, पनवेल तालुका, तळोजा, उरण, न्हावाशेवा, मोरा पोलीस ठाण्याच्या परिसरात सहज दिसणाऱ्या सार्वजनिक ठिकाणी चिटकवून ध्वनीक्षेपकाद्वारे प्रक्षेपित करून त्याचा प्रचार करावा व तशा कागदोपत्री नोंदी ठेवाव्यात, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# निजामपूरमध्ये महिलेचा विनयभंग; गुन्हा दाखल

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील निजामपूर येथे महिलेचा विनयभंग झाल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी आरोपीवर पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, ९ डिसेंबर रोजी १०.१५ वा. फिर्यादी (रा. निजामपूर) यांच्या घराचे पाठीमागे असलेले पडवीतील बाथरुममध्ये अंघोळ करीत असताना खिडकीतून अचानक मोबाईलचा प्रकाश पडल्याचे त्यांनी पाहिले. एक संशयित आपल्या मोबाईलमध्ये व्हिडिओ शुटींग करीत असल्याचे त्यांच्या लक्षात आले. फिर्यादीने तातडीने त्यांच्या पतीला बोलवले असता तो पळून गेला तसेच या प्रकाराबाबत एका महिला आरोपीने फिर्यादीला शिवीगाळी केली, अशी तक्रार दाखल करण्यात आली आहे. याबाबत माणगाव पोलीस ठाणे येथे भा. दं. वि. ३५४ सी, ५०४, ५०६, ३४, माहिती तंत्रज्ञान अधिनियम, २००० (२००८चे सुधारणेसह) ६६ ई प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पो. नि. राजेंद्र पाटील हे करीत आहेत.

## पनवेलमध्ये महिलेची हत्या

**पनवेल** : तालुक्यातील धामणी गावाकडे जाणाऱ्या रोडवर गाढी नदीच्या पुलाखाली नदीच्या पात्रात २५ वर्षीय तरुणीचा मृतदेह आढळून आला असून या महिलेची हत्या करण्यात आली आहे. याबाबत पनवेल तालुका पोलीस आरोपीचा शोध घेत आहेत. या महिलेबाबत अधिक माहिती असल्यास पनवेल तालुका पोलीस ठाणे येथे संपर्क साधावा, असे आवाहन आहे.






**पनवेल : तालुक्यातील कसळखंड ग्रुप ग्रामपंचायतीच्या सरपंच माधुरी अनिल पाटील यांच्या पाठपुराव्यामुळे ग्रामपंचायतीमार्फत ग्रामनिधी अंतर्गत कसळखंड स्टॉप ते गावापर्यंत जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर गतिरोधक बसविण्यात आले.**

# विवाहित महिलेवर अत्याचार

## महाड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**महाड : प्रतिनिधी**

महाड तालुक्यातील कोथेरी गावातील एका विवाहित महिलेवर अत्याचार करीत तिचा मोबाईलमध्ये फोटो आणि व्हिडिओ क्लीप काढत व्हायरल करण्याची धमकी देत वारंवार अत्यचार करणाऱ्या तीन आरोपींविरोधात महाड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




फिर्यादी पीडित महिलेचा पती आजारी असल्याने काचले येथील काशिनाथ कृष्णा पवार आणि आशा काशिनाथ पवार यांनी पतीवर कोणीतरी करणी केल्याचे सांगितले. त्यानंतर त्याच्या अंगावरून तांदूळ काढून फेकून देत तेथून ते निघून गेले, मात्र त्यानंतर आरोपी काशिनाथ हा पुन्हा पीडित महिलेच्या घरी आला आणि कागदाच्या पुडीत आणलेली पावडर आजारी पतीला पाण्यातून दिली. यामुळे पीडितेच्या पतीला गुंगी आली. आरोपी काशिनाथ याने या वेळी पीडितेच्या इच्छेविरोधात अत्याचार केला. आरोपीने या महिलेचे व्हिडिओ क्लीप आणि फोटो काढत व्हायरल करण्याची धमकी देत वारंवार अत्याचार केला आणि तिच्याकडून सुमारे १२ लाख रुपये धमकी देऊन घेतले. ही घटना मे २०१६ ते सप्टेंबर २०२१ यादरम्यान घडली आहे.

या प्रकरणी पीडित महिलेने काशिनाथ पवार, आशा पवार, अभी पवार (सर्व रा. काचले महाड सध्या रा. चेंबूर मुंबई) यांच्याविरोधात भादंवि.कलम ३७६(न), ३८४, ३८५, ३२८, ५०६, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस सबइन्स्पेक्टर पांडुरंग कापडेकर हे करीत आहेत.

# विकासाला प्राधान्य न देणाऱ्यांना मतदार जागा दाखवतील

## कोर्लई येथील बाळासाहेबांच्या शिवसेनेतील ग्रामपंचायत उमेदवार आक्रमक

**मुरूड : प्रतिनिधी**

गेली अनेक वर्ष कोर्लई ग्रामपंचायतीवर शिवसेनेची सत्ता आहे. सरपंच प्रशांत मिसाळ यांनी विकास न करता भकास केला आहे. अनेक कामात भ्रष्टाचार केला आहे. याबाबत रेवदंडा पोलीस ठाण्यात गुन्हासुद्धा दाखल करण्यात आला आहे. भ्रष्टाचार मुक्त ग्रामपंचायत असावी म्हणून आम्ही कोर्लई ग्रामपंचायतीची निवडणूक लढवत असल्याची माहिती पत्रकार परिषदेमध्ये कोर्लई ग्रामपंचायतीमधील बाळासाहेबांच्या शिवसेनेचे सरपंचपदाचे उमेदवार दीपाली म्हात्रे, सदस्यपदाचे उमेदवार उपेंद्र बलकवडे व सॅन्ड्रा ॲलेक्स रोझारिओ यांनी केले आहे.



या वेळी या पत्रकार परिषदेत जिल्हा संघटिका शुभांगी करडे, जिल्हा उपप्रमुख भरत बेलोसे, तालुका उपप्रमुख मनोज कमाने, भगीरथ पाटील, सी. एम. ठाकूर, स्वस्तिक ठाकूर,विकी वेगास, ख्रिश्चन समाजाचे अध्यक्ष ज्याव रुझारिओ, सचिव रायफल लुवीज वेगस आदी उपस्थित होते.

स्थानिक आमदार महेंद्र दळवी यांच्यावर ख्रिश्चन समाजाचे विशेष प्रेम असून सर्व बांधव त्यांच्यासोबत राहणार असल्याची माहिती या वेळी देण्यात आली. ख्रिश्चन समाजाच्या सभेत आमदारांचा आदर सर्वांनीच राखला असून येथे कोणताही गोंधळ अथवा त्यांचा अवमान होणारी कोणतीही घटना घडलेली नाही. समाज माध्यमात कोर्लई येथे झालेल्या कार्यक्रमाची बातमी विरोधकांनी विरोधात देऊन गैरसमज पसरवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. स्थानिक आमदारांनी आज कोर्लई ग्रामपंचायतीसाठी लाखो रुपयांचा निधी वितरित केल्याने विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकली आहे, मात्र येथील जनता या कृत्याबद्दल त्यांना माफ करणार नसून आमच्या पक्षाचे सरपंच व सदस्य मोठ्या प्रमाणात निवडून येणार असल्याचा विश्वास जिल्हा संघटिका शुभांगी करडे यांनी व्यक्म केला आहे.

ख्रिचन समाजाचे अध्यक्ष ज्याव रुझारिओ यांनी सांगितले की, समाज माध्यमात आमदारांविरोधात चुकीचे व खोडसाळ वृत्त दिले असून याचा आम्ही निषेध करीत आहोत. या निवडणुकीत ख्रिश्चन समाजाशी बेलदार व आदिवासी संघाचा पाठिंबा आम्हाला मिळाला असल्याची माहिती त्यांनी दिली.

# नांदेड-पनवेल एक्स्प्रेसचा चिपळूणपर्यंत विस्तार करण्याची मागणी



**मुंबई : प्रतिनिधी**

मध्य रेल्वे मार्गावरील धावणाऱ्या नांदेड पनवेल एक्स्प्रेसचा चिपळूणपर्यंत विस्तार करण्याची मागणी जल फाउंडेशनच्या कोकण विभागाकडून करण्यात आली आहे. यासंदर्भात मागणीचे पत्र रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांना देण्यात आले आहे.

नांदेड पनवेल एक्स्प्रेस ही गाडी मराठवाडा विभागातून थेट कोकणात आली, तर विद्यार्थ्यांना त्याचा मोठा फायदा होणार आहे, तसेच ही गाडी पुण्यातून येत असल्याने कोकणातून जाणाऱ्या प्रवाशांनादेखील पर्याय उपलब्ध होणार आहे. ही गाडी पनवेल ते चिपळूण असा दिवसा प्रवास करणार असल्याने दुसऱ्या गाड्यांवर असलेला ताण कमी होणार आहे. त्यामुळे रेल्वेने नांदेड-पनवेल एक्स्प्रेसचा चिपळूणपर्यंत विस्तार करण्याची मागणी जल फाउंडेशनच्या कोकण विभागाचे संस्थापक अध्यक्ष नितीन सखाराम जाधव यांनी केली आहे.

पनवेल रेल्वेस्टेशन अत्याधुनिक आणि किमान २५ प्लॅटफॉर्म असणारे महत्त्वाचे स्थानक आहे. भविष्यात सर्व मेल एक्स्प्रेस गाड्या तिकडून सोडल्या जातील. मुंबईमध्ये वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन उपनगरीय लोकलसाठी सर्व रेल्वे ट्रॅक उपलब्ध करून देण्याची तयारी रेल्वेकडून सुरू आहे. सध्या नेत्रावती आणि मत्स्यगंधा तात्पुरत्या स्वरूपात पनवेलवरून सुटत आहेत तसेच भविष्यात अजून काही गाड्या पनवेलमधून सोडण्याचे नियोजन रेल्वेकडून करण्यात येत आहे.

# खुनाच्या गुन्ह्याची १२ तासांत उकल

## कर्जतमधील तीन पोलिसांचा कोकण परिक्षेत्र महानिरीक्षक पुरस्काराने सन्मान

**कर्जत : प्रतिनिधी**

माथेरान येथे पर्यटनासाठी आणून पत्नीची मुंडके कापून खून करणाऱ्या नराधम तरुणाला १२ तासांच्या आत पकडून आणून गुन्ह्याची उकल माथेरान आणि नेरळ पोलिसांनी केली होती. दरम्यान या दोन्ही पोलीस ठाण्याच्या एक अधिकारी आणि दोन पोलीस कर्मचारी यांचा कोकण परिक्षेत्र महानिरीक्षक यांच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



या खुनाच्या गुन्ह्यातील आरोपी तरुणाला नवीन पनवेलमधून ताब्यात घेण्यात महत्त्वाचा सहभाग असल्याने नेरळ पोलीस ठाण्याचे प्रभारी पोलीस अधिकारी राजेंद्र तेंडुलकर यांचा तसेच माथेरानमधील सीसीटीव्ही फुटेजच्या माध्यमातून आरोपीपर्यंत पोहचण्यासाठी पोलिसांना मार्ग दाखवणारे माथेरान पोलीस ठाण्याचे दोन पोलीस कर्मचाऱ्यांनादेखील या वेळी सन्मानित करण्यात आले.

गुन्हे प्रकटीकरण पथकाचे प्रमुख नेरळ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजेंद्र तेंडुलकर यांचा तसेच माथेरान पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण विभागाचे पोलीस कर्मचारी अरविंद ठाकूर आणि डी. डी. खेतेले यांचा सन्मान पोलीस महासंचालकांचे गुन्ह्यातील अन्वेषण सर्वोत्कृष्ट प्रयत्न याबद्दल पुरस्कार देऊन तिघांचा सन्मान कोकण परिक्षेत्र महानिरीक्षक संजय मोहिते यांचे हस्ते या वेळी करण्यात आला.




**पनवेल : स्वच्छ भारत अभियानांतर्गत जाणीव एक सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष, माजी नगरसेवक तथा भाजप शहर सरचिटणीस नितीन पाटील यांच्यातर्फे पनवेल गुन्हे शाखा, युनिट २ येथे ओला व सुक्या कचऱ्याच्या दोन पेट्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र पाटील, पोलीस अजित पाटील यांच्या उपस्थितीत देण्यात आल्या. या वेळी भाजप शहर संयोजक प्रसाद हनुमंते, मंगेश चंदने, महेश सरदेसाई, विजय डिसोझा, केतन खुटले उपस्थित होते. उपस्थितांनी पोलीस कर्मचाऱ्यांना ओल्या व सुक्या कचऱ्याचे वर्गीकरण याबाबत महत्त्वही पटवून दिले.**

## गावचे भविष्य घडविण्यासाठी विचार करून मतदान करा

या प्रचार रॅली व सभेस पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक हरेश केणी, बबन मुकादम, पापा पटेल तसेच प्रवीण ठाकूर, मनसे तालुका अध्यक्ष रामदास पाटील, रवींद्र म्हात्रे, कैलास माळी, तानाजी पाटील, रवी म्हात्रे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

भाताण ग्रामपंचायत निवडणुकीत भाजप व मनसे युतीचे थेट सरपंचपदाचे उमेदवार तानाजी लक्ष्मण पाटील असून प्रभाग क्रमांक १मधून नितेश चंद्रकांत भोईर, प्रमिला कृष्णा जुमारे, रजनी किरण मुकादम; प्रभाग क्रमांक २मधून रसिका स्वप्नील भोईर, विजय विष्णू ठाकूर; प्रभाग क्रमांक ३मधून मारुती नामदेव सते, योगिता दीपक दुर्गे निवडणूक लढवित आहेत. या निवडणुकीसाठी १८ डिसेंबरला मतदान होणार आहे.

# कल्याण येथे उद्या महारोजगार मेळावा; १३ हजार १०९ पदांवर संधी

**मुंबई : प्रतिनिधी**

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाअंतर्गत असलेल्या ठाणे जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र यांच्यामार्फत येत्या शनिवारी (दि. १७) कल्याण येथे पंडीत दीनदयाळ उपाध्याय महारोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या मेळाव्यात विविध नामांकीत कंपन्या, कॉर्पोरेट संस्था, उद्योग यांच्याकडील १३ हजार १०९ रिक्त पदे उपलब्ध करून देण्यात येणार असून या कंपन्यांचे प्रतिनिधी थेट मुलाखती घेणार आहेत. त्यामुळे नोकरी इच्छुक उमेदवारांनी मेळाव्यात सहभागी व्हावे, असे आवाहन कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी केले आहे.

शनिवारी सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत गुणगोपाळ मंदिर मैदान, तिसगाव, चक्की नाका चौक, कल्याण (पूर्व) येथे हा मेळावा आयोजित करण्यात आला आहे. मेळाव्याचे उद्घाटन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, कौशल्य विकास मंत्री लोढा, कौशल्य विकास विभागाचे सचिव तथा आयुक्त डॉ. रामास्वामी एन. यांच्यासह जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी व मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे.

मेळाव्यामध्ये क्रेस कॉर्पोरेशन लिमिटेड, एएससीआयआय प्रा. लि., स्टेल्थ हेल्थ मॅनेजमेंट, रिलायबल लॅब्स, घार्डा केमिकल्स, हॉकीन्स कुकर्स, पीएसएन सप्लाय चेन सोल्युशन्स, आदिश कन्सलटन्सी, इंडो अमाईन्स, रिलायबल एचयूबी इंजिनिअरीग (इंडिया), पितांबरी प्रॉडक्टस्, भारत गिअर्स, सुयश ग्लोबल, सँडस् सिनर्जी, पुरोहीत टेक्सटाईल अँड प्रॉडक्टस्, प्रोमोज इंजिनिअरींग, जेड रबर प्रॉडक्ट, कल्पवृक्ष, कनेक्ट वेल इंडस्ट्रीज, बीईडब्ल्यू इंजिनिअरींग, मार्करीच प्रल, नेक्सजी प्रल एलएलपी आदी विविध नामांकित कंपन्या सहभागी होणार आहेत. या कंपन्यांमधील १३ हजार १०९ रिक्त पदे उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

यासोबतच या मेळाव्यात तरुणांना मुलाखतीसंदर्भातील मार्गदर्शन करण्यासाठी तज्ज्ञ मंडळी उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे या मेळाव्यात जास्तीत जास्त नोकरी इच्छुक उमेदवारांनी सहभाग नोंदवून रोजगाराची संधी प्राप्त करून घ्यावी, असे आवाहन मंत्री लोढा यांनी केले आहे.

# उसर्ली खुर्दच्या माजी सरपंचांवर अटकेची टांगती तलवार!

## अटकपूर्व जामीन अर्ज पनवेल सत्र न्यायालयाने फेटाळला

## बनावट कागदपत्रांद्वारे दिलेली बांधकाम परवानगी भोवणार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

बनावट कागदपत्रे तयार करून नैना क्षेत्रात बांधकाम परवानगी दिल्याप्रकरणी उसर्ली खुर्द ग्रामपंचायतीचे शेतकरी कामगार पक्षाचे माजी सरपंच प्रमिला मोहन भगत आणि विश्वास लक्ष्मण भगत यांचा अटकपूर्व जामीन अर्ज पनवेल येथील सत्र न्यायालयाने फेटाळला आहे. त्यामुळे त्यांच्यावर अटकेची टांगती तलवार आहे.

माजी सरपंच प्रमिला भगत व विश्वास भगत यांनी अधिकार बसताना उसर्ली खुर्द ग्रामपंचायतीची बोगस कागदपत्रे व शिक्के तयार करून ग्रामपंचायत हद्दीतील नैना क्षेत्रात अनेक बांधकाम परवानग्या दिल्या होत्या. नैना स्थापन होण्यापूर्वीची तारीख टाकून या परवानग्या दिल्या असल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. या प्रकरणी पडताळणी करून जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी पनवेलच्या गटविकास अधिकाऱ्यांना उसर्ली खुर्द ग्रामपंचायतीचे माजी सरपंच प्रमिला भगत व विश्वास भगत यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार उसर्ली खुर्दचे ग्रामसेवक आर. एम. ढेरे यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात माजी सरपंच प्रमिला भगत आणि विश्वास भगत यांच्यावर गुन्हा दाखल करण्यासाठी लेखी तक्रार दाखल केली होती. त्या अनुषंगाने प्राप्त पुराव्याच्या कागदपत्रांची छाननी करून पनवेल शहर पोलिसांनी तत्कालीन सरपंच विश्वास भगत व प्रमिला भगत यांच्याविरुद्ध १ जुलै २०२२ रोजी भा.दं.वि. कलम ४२०, ४६५, ४६६, ४६८, ४७१, ४७३, ३४ अन्वये गुन्हा दाखल केला.

या पार्श्वभूमीवर विश्वास भगत व प्रमिला भगत यांनी अटकपूर्व जामीन मिळावा यासाठी पनवेल येथील सत्र न्यायालयात अर्ज दाखल केला होता, मात्र हा अर्ज ७ डिसेंबर रोजी न्यायालयाने फेटाळला आहे. पोलिसांच्या मागणीनुसार आरोपींना कोठडी सुनावून या संपूर्ण प्रकरणाची कसून चौकशी करावी, असे आदेश न्यायालयाने दिले आहेत.

माजी सरपंचांनी गुन्ह्यामध्ये नागरिकांची फसवणूक करणे, बनावट सरकारी शिक्के तयार करणे, ग्रामपंचायतीच्या बनावट लेटरहेडचा वापर करणे, सार्वजनिक अभिलेखांचा दुरूपयोग करणे, बनावट दस्त तयार करून तो खरा असल्याचा बनाव करणे, बनावटीकरण करणे आणि बिल्डर, विकसक, वास्तूविषारद यांच्याबरोबर संगनमत करून अनधिकृत इमारत बांधकामांना चालना देणे असे अनेक गैरव्यवहार केले आहेत. या प्रकरणी अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळल्यामुळे माजी सरपंच विश्वास भगत व प्रमिला भगत यांना अटक होण्याची शक्यता आहे.

# पनवेल महापालिका हद्दीत गोवर प्रतिबंधात्मक लसीकरण सुरू



**पनवेल : प्रतिनिधी**

गोवर-रुबेला लसीकरण मोहीम पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रात दोन टप्प्यांमध्ये राबविण्यात येणार असून या मोहिमेची पहिली फेरी १५ ते २५ डिसेंबर व दुसरी फेरी १५ ते २५ जानेवारी २०२३ या कालावधीत राबविण्यात येणार आहे. गुरुवारी (दि. १५)पासून १५० जणांच्या टिमच्या साहाय्याने घरोघरी जाऊन गोवर प्रतिबंधात्मक लसीकरणास पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रात सुरुवात झाली आहे.

राज्य शासनाकडील सूचनांनुसार विशेष गोवर रुबेला लसीकरण मोहीम पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रात गुरुवारपासून राबविण्यास सुरुवात झाली आहे. यासाठी महापालिकेने १५० जणांच्या टिमच्या साहाय्याने घरोघरी जाऊन गोवर प्रतिबंधात्मक लसीकरणास पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रात सुरुवात केली आहे. पहिली फेरी १५ ते २५ डिसेंबरपर्यंत असणार आहे. दुसरी फेरी १५ ते २५ जानेवारी २०२३ या कालावधीत असणार आहे. या लसीकरण मोहिमेस नागरिकांनी सहकार्य करावे, ज्या बालकांचे लसीकरण राहिले आहे अशा नागरिकांनी पुढे येऊन आपल्या बालकांचे गोवर-रूबेला लसीकरण पूर्ण करून घेण्याचे आवाहन आयुक्त गणेश देशमुख यांनी केले आहे, तसेच आपल्या परिसरात गोवर-रूबेलाचे रूग्ण आढळल्यास महापालिकेच्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रास जरूर कळवावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रनिहाय रोज १५० जणांच्या टिमच्या साहाय्याने १४ हजार ७३५ घरांचे सर्वेक्षण याअंतर्गत केले जाणार आहे. यासाठी नर्सिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांची मदत घेतली जाणार आहे. नियमित लसीकरण वेळापत्रकानुसार गोवर रुबेला लसीचा पहिला डोस नऊ महिने ते १२ महिने या वयात, तर दुसरा डोस १६ महिने ते २४ महिने या वयात घेणे अपेक्षित आहे. या अनुषंगाने बुधवारी सिटी टास्क फोर्सची बैठक आयुक्त गणेश देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली होती. याबैठकित आशा वर्कर्स, एएनएम, जीएनएम यांनी योग्य तऱ्हेने सर्वेक्षण करण्याच्या सूचना या वेळी देण्यात आल्या.

## पनवेल बार असोसिएशन निवडणुकीत ॲड. मनोज भुजबळ पॅनेलचे सुशांत घरत बिनविरोध



**पनवेल : वार्ताहर, प्रतिनिधी**

पनवेल बार असोसिएशन कार्यकारिणीच्या निवडणुकीत ॲड. मनोज भुजबळ यांच्या पॅनेलचे ॲड. सुशांत घरत हे बिनविरोध विजयी झाले आहेत.

पनवेल बार असोसिएशनच्या कार्यकारिणीची निवडणूक २१ डिसेंबर रोजी होत असून यामध्ये असोसिएशनचे माजी अध्यक्ष ॲड. मनोज भुजबळ पुन्हा अध्यक्षपदासाठी रिंगणात उभे असल्याने ही निवडणूक चुरशीची होणार आहे. ॲड. मनोज भुजबळ यांच्या पॅनेलने या निवडणुकीत ११ उमेदवार उभे केले.

ॲड. मनोज भुजबळ प्रत्येक मतदारांच्या भेटीगाठी घेऊन पुन्हा एकदा निवडून देण्याचे आवाहन करीत आहेत. यंदाच्या निवडणुकीत सचिव पदासाठी ॲड. प्रल्हाद खोपकर हे चौथ्यांदा उभे राहिले आहेत, तर उपाध्यक्षपदासाठी ॲड. संदीप जगे, सहसचिव पदासाठी ॲड. सिमा भोईर, खजिनदार पदासाठी ॲड. धनराज तोकडे, ऑडिटर पदासाठी ॲड. विशाल डोंगरे तर सदस्य पदासाठी ॲड. प्रगती माळी, दीपाली बोहरा, अमित पाटील, भूषण म्हात्रे निवडणुकीच्या रिंगणात उभे आहेत. २१ डिसेंबर रोजी सकाळी ९ ते ५ दरम्यान नवीन कोर्ट इमारत येथे मतदान होणार आहे.

आम्ही निवडून आल्यास वकिलवर्गाच्या न्यायालयीन कामाकाजाच्या व इतर समस्या सोडविणार असून नवोदित वकिलांसाठी शैक्षणिक व कल्याणकारी योजना प्रभावीपणे राबविणार आहोत. त्यामुळे मतदारांनी पुन्हा आम्हाला निवडून द्यावे, असे आवाहन ॲड. मनोज भुजबळ यांनी केले आहे.

## पागोटे खाडीत केमिकलयुक्त पाणी सोडल्याने मृत माशांचा खच

**उरण : प्रतिनिधी**

पागोटे-कुंडेगाव खाडीत गुरुवारी (दि. १५) सकाळी हजारो मासे मृत झाल्याचे दिसून आले. मच्छिमारांच्या उपजीविकेचे साधन असणाऱ्या या खाडीमध्ये परिसरातील कंपन्यांचे केमिकलयुक्त पाणी सोडल्यामुळे मासे मृत्यूमुखी पडल्याचा आरोप कोळी बांधवांनी केला आहे.

उरण तालुक्यात अनेक लहान-मोठ्या खाड्या आहेत. या खाड्यांमध्ये अत्यंत चवदार मासळी मिळते. अनेक मासेमार या खाड्यांमध्ये मासेमारी करून आपली उपजीविका करतात, मात्र द्रोणागिरी विभागात असणाऱ्या पागोटे-कुंडेगाव खाडीत गुरुवारी हजारो मृत माशांचा खच पडल्याचे दिसून आला आहे. खाडीतील मासे मृत्यूमुखी पडल्यामुळे मासेमारीवर उपजीविका करणाऱ्या मच्छीमारांचे अतोनात नुकसान झाल्याने शासकीय यंत्रणांनी केमिकलचे पाणी सोडणाऱ्या कंपन्यांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी कोळी बांधवांनी केली आहे.



**पागोटे खाडीत मासे मृत अवस्थेत पडल्याचा प्रकार गंभीर असून सद्यस्थितीची पाहणी करून दोषी कंपनीवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.**
**-सचिन अडकर, प्रदूषण नियंत्रण मंडळ अधिकारी, उरण**



**पनवेल : ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ जे. डी. तांडेल यांचे पुत्र अमोल तांडेल आणि सुधीर वागळे यांची कन्या श्रेया वागळे यांचा विवाह शेडूंग येथील आयुष रिसॉर्टमध्ये झाला. या सोहळ्यास महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी उपस्थित राहून नवदाम्पत्याला वैवाहिक जीवनासाठी शुभेच्छा दिल्या.** (छाया : अक्षय शार्दुल)

## साईबाबा मंदिराचा वर्धापन दिन उत्साहात

**उरण : बातमीदार**

उरण तालुक्यातील खोपटे येथील श्री साईबाबा मंदिराचा पाचवा वर्धापन दिन मंगळवारी (दि. १३) मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी विविध धार्मिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

सकाळी काकडा आरती, मंगल स्नान, होम हवन नवग्रह पुजन, रूद्र पुजन, कुळदैवत, भवानी पुजन, श्री सत्यनारायण पुजा, श्री साईबाबा मध्यान आरतीनंतर साई भंडारा महाप्रसाद सुरू झाला तो रात्री ११ वाजेपर्यंत सुरूच होता. संध्याकाळी ५ वाजता श्री गोपाळ काका हरीपाठ मंडळाचा हरीपाठ कार्यक्रम, सायंकाळी ७ वाजता श्री साईबाबा ची सांज आरती, आठ वाजता वडग्रुप प्रस्तुत साईगितांचा भक्तीमय गायन कार्यक्रम झाला. वर्धापन साजरा करण्यासाठी डाकी कुटुंब, श्री साई सेवक मंडळ खोपटे, नवतरुण गणेश नवरात्रौत्सव मंडळ, पूर्व विभाग साई सेवक, ग्रामस्थ मंडळ खोपटे-बांधपाडा, साईसेवक व मित्र परिवार आदींनी विशेष मेहनत घेतली.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात प्रशिक्षण शिबिर



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात गुरुवारी (दि. १५) आजीवन अध्ययन व विस्तार विभागातर्फे आजीवन व अध्ययन व विस्तार विभागातील विद्यार्थ्यांसाठी प्रथम सत्र प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

प्रशिक्षण कार्यक्रमासाठी चांगु काना ठाकूर आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयाचे क्षेत्र समन्वयक प्रा. डॉ. बी. एस. पाटील हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. महाविद्यालयातील डीएलएलईच्या सुमारे १५० विद्यार्थ्यांनी प्रशिक्षण घेतले. या प्रशिक्षण कार्यक्रमाद्वारे उपस्थितीना डीएलएलई अंतर्गत करण्यात येणाऱ्या सहा प्रकल्पांची सविस्तर माहिती व प्रकल्प कसे लिहावेत याविषयी माहिती देण्यात आली. प्रस्तुत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रुपेंद्र गायकवाड यांनी विद्यार्थी व विद्यार्थिनींना प्रशिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या व मार्गदर्शन केले. या प्रशिक्षणाचे आयोजन आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे समन्वयक प्रा. महेश धायगुडे यांनी केले, तसेच प्रा. योगिता पाटील, प्रा. प्रथमेश उदेकर, प्रा. विशाल देशमुख, प्रा. डॉ. फारुख शेख, प्रा. सफिना मुकादम यांनी सहकार्य केले.

या कार्यक्रमाबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, उपाध्यक्ष अरुण शेठ भगत, संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख व संस्थेचे सचिव डॉ. सिद्धेश्वर गडदे यांनी कौतुक केले.



**पनवेल : सरदार वल्लभभाई पटेल यांच्या पुण्यतिथीनिमित्त भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी अभिवादन केले. या वेळी इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.**

## बारदानसाठ्यासाठी निविदा सादर करण्याचे आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हाधिकारी कार्यालयाकडून नमूद केलेल्या शासकीय गोदामांतून प्रत्येक गोदामांसमोर दर्शविल्याप्रमाणे तुकडा बारदानाचा साठा जसा असेल तसा व जेथे असेल तेथून या तत्त्वावर निविदा पद्धतीने विक्रीस काढण्यात आला आहे. हा बारदान साठा घेऊ इच्छिणाऱ्यांकडून मोहोरबंद निविदा मागविण्यात आल्या आहेत.

पनवेल येथील गोदामात उपयोगी बारदाने (नग) ज्यूट दोन हजार ४०० किलो, निरुपयोगी बारदाने (नग) ज्यूट १६ हजार ५५७ किलो व उरण येथील गोदामात उपयोगी बारदाने (नग) ज्यूट दोन हजार १७८ किलो, निरुपयोगी बारदाने (नग) ज्यूट तीन हजार ८४०किलो साठा विक्रीसाठी काढण्यात आला आहे.

## 'सीकेटी'च्या एनसीसी कॅडेट्सचे देदीप्यमान यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स (सीकेटी) (स्वायत्त) महाविद्यालयातील नॅशनल कॅडेटस् कौर (एनसीसी) कॅडेट्सची रिपब्लिक डे कॅम्पसाठी निवड झाल्याने महाविद्यालयाच्या शिरपेचात पुन्हा एकदा मानाचा तुरा खोवला गेला आहे.



महाराष्ट्र संचालनालया अंतर्गत मुंबई ग्रुप-अ मधून एकूण १११ कॅडेटची या रिपब्लिक डे कॅम्पसाठी निवड करण्यात आली आहे, यामध्ये नॅशनल कॅडेटस् कौरचे कॅडेटस सिनियर अंडर ऑफिसर ओमकार देशमुख आणि सीडीटी प्रणाली चव्हाण यांचीही निवड करण्यात आली. या निवडीसाठी मुंबई विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये आणि पुणे मुख्यालय येथे आयोजित एकूण नऊ कॅम्पमध्ये हे कॅडेट्स सहभागी झाले होते. या यशाबद्दल सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील, आयक्यूएसी समन्वयक डॉ. बी. डी. आघाव, नॅशनल कॅडेटस् कौर विभागाचे प्रमुख प्रो. डॉ. यू. टी. भंडारे आणि केअर टेकर ऑफिसर प्रा. एन. पी. तिदार, विज्ञान शाखाप्रमुख डॉ. जे. एस. ठाकूर, डॉ. एलिझाबेथ मॅथ्यूज, डी. एस. बर्वे, प्राणीशास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ. एम. ए. म्हात्रे तसेचश्री. किशोर देवधेकर,अध्यक्ष, दृष्टी फाउंडेशन आणि प्रदीप दावकर, रोटरी क्लब, पनवेल हे उपस्थित होते. या वेळी त्यांनी नॅशनल कॅडेटस् कौरचे महाविद्यालयीन जीवनातील महत्त्व अधोरेखित केले व कॅडेट्सच्या यशाबद्दल त्यांचे अभिनंदन केले.

या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर आणि सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी आयोजकांचे कौतुक केले.

# पनवेल महापालिकेची वैद्यकीय सेवा ग्रामीण भागातही मिळणार

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल पालिका क्षेत्रातील ग्रामीण भागापर्यंत पालिकेची आरोग्य वैद्यकीय सेवा पोहचावी यासाठी पालिका प्रशासन ग्रामीण भागात जागा भाड्याने घेणार आहे. पालिकेच्या आरोग्य विभागाने यासाठी जागेची चाचपणी सुरू केली असून गावातील नागरिकांना खेड्यातच वैद्यकीय सेवा मिळण्यासाठी हे नियोजन केले आहे.

पनवेल पालिका हद्दीत सध्या सहा विविध आरोग्य केंद्र आहेत. पनवेल शहरातील गावदेवीपाडा येथील महाराष्ट्र व्यायामशाळेसमोर, कोळीवाडा येथील अभिदीप सोसायटीत, नवीन पनवेल येथील बांठिया शाळेजवळील समाजमंदिरात, कळंबोली येथील गुरुव्दारासमोर, खारघर येथील सेक्टर १५मधील अयप्पा मंदिराजवळ, कामोठे येथील सेक्टर ८मधील एनएनआर शाळेच्या पाठीमागे येथे ही आरोग्य केंद्र सुरू आहेत. लोकसंख्येनुसार या परिसरात अजून नऊ आरोग्य केंद्र सुरू करण्यासाठी वैद्यकीय आरोग्य विभाग प्रयत्नशील आहे. पालिकेचे आरोग्य विभागाचे प्रमुख उपायुक्त सचिन पवार आणि पालिकेच्या वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. रेहना मुजावर यांनी खेड्यांमध्ये जागांची पाहणी केली.

पालिकेने केलेल्या जागेच्या नियोजनानुसार चार ठिकाणी पालिकेच्या मालकीच्या जागेवर आरोग्य केंद्राची उभारणी करणार आहे. यामध्ये पूर्वाश्रमीच्या भिंगारी व कळंबोली ग्रामपंचायत कार्यालय, पालेखुर्द ग्रामपंचायत कार्यालय, खारघर व रोहींजण या जागा निश्चित केल्या आहेत, तसेच इतर पाच जागा भाडेतत्त्वावर घेणार आहे. यामध्ये खांदा कॉलनी व नवीन पनवेलकरांना सोयीचे ठिकाण पालिका शोधात आहे. खारघर सेक्टर ३६ येथे, तळोजा फेस १ येथे, कामोठे सेक्टर ३४ येथे तसेच कामोठे वसाहतीमधील सेक्टर २० ते २२ या परिसरातील जागा भाडेतत्त्वावर घेण्याचा पालिका विचाराधीन असल्याची माहिती उपायुक्त सचिन पवार यांनी दिली.

याव्यतिरिक्त टेंभोडे, तळोजा पाचनंद, कोयनावेळे, पडघे, खारघर (समाजमंदिर सेक्टर १२) आसूडगाव (समाजमंदीर) येथे वेलनेस सेंटर सुरू करणार आहे. यामध्ये दिवसभर पालिकेचा दवाखाना दिवसा सुरू राहील.

## संपादकीय

# अस्तित्वाची धडपड?

आपल्या महामोर्चाला 'अभूतपूर्व' म्हणतात तो प्रतिसाद मिळवण्यासाठी महाविकास आघाडीच्या नेत्यांनी आपापली शक्ती पणाला लावलेली दिसते. गर्दी जमवणे म्हणजे प्रतिसाद मिळवणे असा अर्थ होत नाही. हल्लीच्या काळात गर्दी कशी जमवतात त्याचे एक तंत्र विकसित झाले आहे. बसगाड्या भरभरून माणसे आणली की गर्दी जमते. ती कशी जमते हे उघड गुपित आहे. त्यामुळे या महामोर्चाला जमणाऱ्या गर्दीला जनतेचा प्रतिसाद म्हणणे हास्यास्पद ठरेल.

**महामहीम राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी शिवछत्रपतींबाबत केलेले तथाकथित वादग्रस्त वक्तव्य, कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांनी उकरून काढलेला सीमावाद, बेरोजगारी आणि महागाई इत्यादी मुद्द्यांवर गेले काही दिवस महाराष्ट्रात जे राजकीय रणकंदन सुरू आहे त्याचा कळसाध्याय शनिवारी मुंबईत बघायला मिळेल असे दिसते. महाविकास आघाडीतील तिन्ही पक्ष तसेच त्यांच्या नव्या-जुन्या मित्रपक्षांनी मिळून महाराष्ट्रद्रोहींविरोधात महामोर्चा काढण्याचे ठरवले आहे. या मोर्चाला अभूतपूर्व प्रतिसाद मिळेल असा ठाम विश्वास महाविकास आघाडीच्या नेत्यांनी व्यक्त केला आहे, पण ज्या मुद्द्यांवर महाविकास आघाडीने या महामोर्चाचे आयोजन केले आहे ते मुद्देच हवेत विरून गेल्यात जमा आहेत. शिवछत्रपतींचा अवमान माझ्यासारख्या कार्यकर्त्याकडून होणे शक्यच नाही. माझ्या विधानाचा सोयीस्कर विपर्यास करून अकारण राजकीय रान उठवण्यात आले आहे असे राज्यपालांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना पत्र पाठवून स्पष्ट केले आहे. सीमाप्रश्न ज्या बोम्मई यांच्या एका वादग्रस्त ट्वीटवरून पुन्हा एकदा उकरला गेला ते ट्वीट बनावट अकाऊंटवरून प्रसिद्ध झाल्याचे आता निष्पन्न झाले आहे. इतकेच नव्हे तर कर्नाटकचे मुख्यमंत्री आणि महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांशी एकत्रितपणे बैठक घेऊन गृहमंत्री अमित शाह यांनी हा वाद तूर्तास संपूर्णपणे शमवला आहे. महाराष्ट्र-कर्नाटक सीमावाद सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे. न्यायालयाचा निवाडा अंतिम राहील अशी ग्वाही उभय राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी दिली आहे. महाराष्ट्राच्या मंत्र्यांना कर्नाटक सरकारतर्फे सन्मानपूर्वक निमंत्रित करण्यात येईल असेही मुख्यमंत्री बोम्मई यांनी संयुक्त बैठकीत नि:संदिग्धपणे सांगितले. बेरोजगारी आणि महागाई हे दोन्ही प्रश्न सोडवण्यासाठी केंद्रीय पातळीवर अहोरात्र प्रयत्न सुरू आहेत आणि त्याला यश येताना दिसत आहे. भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त ७५ हजार सरकारी पदे भरण्याची योजना शिंदे-फडणवीस सरकारने महिन्याभरापूर्वी जाहीर केली होती. या योजनेस प्राधान्य देण्याचा निर्णय नुकत्याच झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. सारांश इतकाच की महामोर्चाचे आयोजन ज्या मुद्द्यांचा निषेध करण्यासाठी केले जात आहे त्यापैकी एकही मुद्दा तूर्त अस्तित्वात नाही. असे असताना विनाकारण गर्दी जमवून महामोर्चाचे नाटक कशासाठी रचले जात आहे असा प्रश्न जनतेच्या मनात उद्‌भवल्यास त्यात गैर काहीच नाही. मुंबईतील भायखळ्याच्या जिजामाता उद्यानापासून छत्रपती शिवाजी टर्मिनसपर्यंत हा मोर्चा जाणार आहे. यासाठी तीन लाखांहून अधिक गर्दी जमवण्याचा चंग महाविकास आघाडीच्या नेत्यांनी बांधला आहे. गर्दी जमवणे सोपे आहे, पण त्यामुळे मुंबईकर चाकरमान्यांना वेठीस धरण्यापलीकडे आणि वाहतुकीचा खोळंबा करून कार्यालयीन वेळेचा अपव्यय होण्यापलीकडे काहीही साध्य होणार नाही. सत्तेवाचून तडफडणाऱ्या महाविकास आघाडीची ही अस्तित्वाची धडपड आहे एवढेच यामधून अधोरेखित होईल. यापेक्षा अधिक सकारात्मक कार्यक्रम विरोधी पक्षांनी हाती घेतला असता तर जनतेचा खराखुरा उत्स्फूर्त पाठिंबा त्यांना मिळाला असता. ती संधी त्यांनी गमावली आहे.**

# क्रीडाभवन मैदानाचे वाहनतळ बनवू नका!

अलिबागमधील समुद्रकिनाऱ्याजवळ असलेले क्रीडाभवन मैदान म्हणजे रायगडचे शिवाजी पार्क. अनेक नामवंत खेळाडू या मैदानावर खेळले आहेत. त्याचबारोबर महान नेत्यांच्या सभाचेदेखील हे मैदान साक्षीदार आहे. असे हे ऐतिहासिक क्रीडाभवन मैदान खेळासाठी कमी वापरेले जाते. या मैदानावर वाहने उभी केली जातात. हे मैदान सध्या वाहनतळ बनले आहे.

**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**



अलिबागमधील प्रतिष्ठीत नागरिकांनी एकत्र येऊन क्रीडाभवन ही संस्था स्थापन केली. १४ जानेवारी १९५५ रोजी त्या वेळच्या कुलाबा जिल्ह्याचे कलक्टर जी. आर. रेड्डी यांच्या हस्ते क्रीडाभवनच्या इमारतीची कोनशिला बसविण्यात आली. ७ नोव्हेंबर १९६५ रोजी क्रिकेटपटू विजय मर्चंट यांच्या हस्ते इमारतीचे उद्‌घाटन करण्यात आले. या ठिकाणी ब्रीज खेळले जात असे. शेषराव वानखेडे अर्थमंत्री असताना ते अलिबागला आले होते. तेव्हा तेदेखील येथे ब्रीज खेळले होते. क्रीडाभवन संस्थेला शासनाने लीजवर मैदान दिले. हे मैदान फार मोठे होते. त्याचा काही भाग जिल्हा शासकीय रुग्णालयासाठी गेला. काही भाग शासकीय विश्रामगृहासाठी गेला. त्यामुळे या मैदानाचा आकार लहान झाला.

या मैदानावर अलिबागमधील क्रिकेटपटू क्रिकेट खेळत असत. दर रविवारी येथे क्रिकेटचे सामने होत असत. मुंबईतील संघदेखील या मैदानावर सामने खेळण्यासाठी येत असत. एका सामन्यात एका फलंदाजाने मारलेल्या षटकारामुळे शेजारील जिजामाता रुग्णालयावरील घड्याळ फुटले. आजही ते घड्याळ तसेच आहे. १९७१ साली खंडू रांगणेकर संघ विरुद्ध खानविलकर संघ असा प्रदर्शनीय सामना झाला होता. या सामन्यात सुनील गावसकर, एकनाथ सोलकर, पॉली उम्रिगर, अजित वाडेकर, उमेश कुलकर्णी आदी खेळाडू खेळले होते. इंदिरा गांधी, यशवंतराव चव्हाण, बाळासाहेब ठाकरे आदी दिग्गज नेत्यांच्या सभांचेदेखील हे मैदान साक्षीदार आहे. अगदी अलिकडच्या काळात येथे २९ ते ३१ डिसेंबर या कालावधीत नाईट क्रिकेट स्पर्धा होत असे. अलिबाग महोत्सवदेखील येथे आयोजित केला जात असे. मॅरेथॉन स्पर्धा होत असे.

दरम्यानच्या काळात लीज संपल्यामुळे शासनाने हे मैदान क्रीडाभवन संस्थेकडून ताब्यात घेतले. हे मैदान संस्थेकडे रहावे म्हणून संस्थेच्या काही लोकांनी प्रयत्न केले, परंतु त्यांच्या प्रयत्नांना यश आले नाही. त्यानंतर या परिसरात शांतता क्षेत्र म्हणून जाहीर करण्यात आले. त्यामुळे मैदानावर स्पर्धा होत नाही की सभा होत नाहीत. जे मैदान नामांकित खेळाडूंनी आपल्या खेळाने व दिग्गज नेत्यांच्या सभांनी गाजवले ते ऐतिहासिक मैदान आता वाहनतळ बनले आहे. दर रविवारी जेथे क्रिकेटच्या स्पर्धा होत असत तिथे आता पर्यटकांच्या गाड्या उभ्या असतात. हे मैदान म्हणजे मोफतचे वाहनतळच बनले आहे.

जेव्हा हे मैदान क्रीडाभवन या संस्थेकडे होते तेव्हा त्याची निगा राखली जात होती, परंतु शासनाने हे मैदान आपल्या ताब्यात घेतले तेव्हापासून या मैदानाकडे दुर्लक्ष झाले. या मैदानाला कुणी वालीच उरला नाही. शासकीय यंत्रणा उदासीन आहे. मैदानाच्या एका कोपऱ्यात बेकायदेशीर टपऱ्या उभारण्यात आल्या तरी यंत्रणा काही करीत नाही.

अलिबाग शहारात क्रीडाभवन हे एकमेव चांगले मैदान आहे. शेजारी एक मैदान आहे, पण त्याचा फारसा उपायोग होत नाही. क्रीडाभवनचे मैदान हे खेळाचे मैदानच राहिले पाहिजे. त्याचे वाहनतळ होता कामा नये. यासाठी जिल्हा प्रशासनाने कडक भूमिका घ्यायला हवी. ज्या टपऱ्या उभारण्यात आल्या आहेत त्या हटविल्या पाहिजेत. या मैदानात वाहने उभी करण्यास बंदी घातली पाहिजे. येथे विविध प्रकारच्या खेळांच्या स्पर्धा आयोजित करायला हव्यात. मैदानात गाड्या येऊ नयेत तसेच अतिक्रमण होऊ नये यासाठी या मैदानाला संरक्षण भिंत बांधायला हवी. जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी संरक्षण भिंत बांधण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत, मात्र त्याची अंमलबजावणी झालेली दिसत नाही.

शांतता क्षेत्र जाहीर केल्यामुळे येथे सभा होत नाहीत. सांस्कृतिक कार्यक्रम होत नाहीत. खेळांच्या स्पर्धा होत नाहीत. रुग्णालय असल्यामुळे हा परिसर शांतता क्षेत्र म्हणून जाहीर करण्यात आला आहे. त्याबाबत फेरविचार व्हायला हवा. या परिसरात डीजे, ढोल ताशे वाजविण्यास बंदी जरूर असावी, परंतु काही कार्यक्रमांसाठी, क्रीडा स्पर्धांसाठी लाउडस्पिकर लावण्यास परवानगी द्यायला हवी.

क्रीडाभवन मैदान क्रिकेटसाठीच प्रसिद्ध आहे. या मैदानावर चांगली खेळपट्टी होती. ज्या खेळपट्टीवर आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू खेळले होते ती खेळपट्टीच आता तेथे राहिलेली नाही. शासनाच्या क्रीडा विभागाच्या योजनेतून येथे चांगल्या खेळपट्ट्या तयार करून नेट्स उपलब्ध करून दिल्यास क्रिकटपटूंना सराव करता येईल. शासनाचे उत्पन्नदेखील वाढेल. याबाबत रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनची मदत घेता येईल. हे मैदान मैदानच राहिले पहिजे यासाठी जिल्हा प्रशासनाने प्रयत्न केले पाहिजेत.



## बदलते तंत्रज्ञान

## 'फ्लिपकार्ट बिग सेव्हींग डेज'मध्ये स्मार्टफोनवर ऑफर

सणासुदीच्या काळात फ्लिपकार्ट सेलचा लाभ घेता आला नसेल तर आता तुमच्यासाठी सुवर्णसंधी आहे.



फ्लिपकार्ट बिग सेव्हींग डेज शुक्रवारपासून (१६ डिसेंबर) सुरू होत असून तो २१ डिसेंबरपर्यंत असणार आहे. यात युजरला स्मार्टफोन, इलेक्ट्रॉनिक डिव्हाइस, होम अप्लायन्स, फॅशन प्रोडक्ट आणि इतर वस्तूंवर मोठी सूट मिळू शकते. या सेलदरम्यान युजरला फ्लिपकार्ट ॲक्सिस बँक कार्डवर पाच टक्के कॅशबॅक मिळू शकतो. त्याचबरोबर, फ्लिपकार्ट पे लेट युजरला काही निवडक खरेदीवर तातडीचे २५० रुपयांचे गिफ्ट कार्ड मिळू शकते.

कंपनीने ट्रेंडिग स्मार्टफोन्सवरील सूट उघड केली नाही, पण ज्या डिव्हाइसेसना सेलदरम्यान ऑफर्स आणि डिस्काउंट मिळणार आहे त्यांची माहिती उघड केली आहे. या फोन्सची माहितीपुढील प्रमाणे आहे.

**१) आयफोन १४**

फ्लिपकार्ट बिग सेव्हींग डेज २०२२ सेलच्या बॅनरनुसार, नवीन ॲप्पल आयफोन १४ स्मार्टफोनवर सूट मिळण्याची शक्यता आहे तसेच सेलदरम्यान जुन्या ॲपल आयफोन्सवरदेखील सूट मिळण्याची शक्यता आहे. आयफोन १३ किंवा आयफोन १२ घेण्याचा विचार असेल तर हा सेल फायदेशीर ठरू शकतो, कारण सेलमध्ये या फोन्सवर मोठी सूट मिळू शकते.

**२) पोको एम ३ आणि रिअलमी सी २०**

तुम्हाला बजेट फोन हवा असल्यास पोको एम३ आणि रिअलमी सी २० हे दोन स्मार्टफोन चांगले पर्याय ठरू शकतात. फ्लिपकार्ट बिग सेव्हींग डेज २०२२ सेलमध्ये कंपनी या दोन्ही स्मार्टफोनची किंमत कमी करेल ज्यामुळे ते आणखी परवडणारे होतील.

सध्या पोको एम ३ फ्लिपकार्टवर १० हजार ९९९ रुपयांमध्ये मिळत आहे आणि याहून कमी किमतीमध्ये हा स्मार्टफोन सेलमध्ये तुमच्यासाठी उपलब्ध होऊ शकतो, तर रिअल मी सी २० स्मार्टफोनची किंमत सात हजार ४९९ रुपये आहे, जी सेलमध्ये अजून कमी होऊ शकते.

**३) विवो टी १५जी**

विवो टी १५जी स्मार्टफोन हा कंपनीचा बजेट फ्रेंडली ५जी सक्षम स्मार्टफोन आहे. सध्या या स्मार्टफोनची किंमत १५ हजार ९९० रुपये असून सेलदरम्यान हा फोन १५ हजार रुपयांपेक्षा कमी किमतीत उपलब्ध होण्याची शक्यता आहे.

# मराठी कोशकार, लेखक चिंतोपंत कर्वे



कर्वे, चिंतामण गणेश म्हणजेच चिंतोपंत कर्वे यांचा जन्म ४ फेब्रुवारी १८९३ रोजी बडोद्यास झाला. तथापि त्यांचे शिक्षण पुणे येथे न्यू इंग्लिश स्कूल व फर्ग्युसन महाविद्यालयात झाले. १९१७मध्ये ते गणित विषय घेऊन पदवीधर झाले. कर्वे यांच्या आप्तांची एक शाखा बंगळुरू येथे होती व तिच्या संपर्कामुळे चिंतोपंतांना कानडी भाषा अवगत होती.

डॉ.श्री.व्यं.केतकर यांनी मराठी ज्ञानकोशाची योजना सिद्ध करण्यासाठी उभारलेल्या कंपनीत कर्वे दाखल झाले, तसेच य.रा. दाते हेही सहभागी झाले. केतकरांच्या हाताखाली कर्वे यांना ज्ञानाचे संकलन करण्याची कला अवगत झाली, भरपूर वाचन झाले व अभ्यास घडला. कोशविद्येचे मर्म हाती आले. नियमितपणे परिश्रम करण्याची सवय लागली. या जोडीने केतकरी खाक्यात काम करण्यास लागणारे धैर्य व चिकाटी दाखवली म्हणूनच नेटाने काम करून ते 'कोशकार' झाले. कर्वे यांचा प्रपंच कसाबसा चालला, परंतु त्यांनी कधी तोंड वेंगाडले नाही किंवा आपल्या कामात उणेपणा येऊ दिला नाही.

**निमित्त**

केतकरांच्या ज्ञानकोशात काम करून, अनुभवाची शिदोरी घेऊन कर्वे-दाते यांनी आणखी दोन सहकार्यांना घेऊन 'महाराष्ट्र शब्दकोशा'ची एक योजना तयार केली व 'महाराष्ट्र कोश मंडळ लि.' नावाची कंपनी काढली. महाराष्ट्र शब्दकोश सिद्ध केल्यानंतर कर्वे-दाते जोडीने 'मराठी वाक्संप्रदाय कोश' हाती घेऊन पुरा केला. या तीन कोशांच्या कामात त्यांची २५ वर्षे खर्ची पडली. त्यानंतर ही जोडी वेगळी झाली. य. गो. जोशी यांनाही अशा प्रकारच्या कामाचा हव्यास व त्यासाठी लागणारी धडाडी होती. कर्वे यांच्या सहकार्याने त्यांनी 'महाराष्ट्र परिचय' या ग्रंथाची योजना केली. महाराष्ट्र संस्कृती संदर्भातील हा एक उत्कृष्ट व उपयुक्त ग्रंथ आहे. कोशकार्याखेरीज कर्वे यांनी 'मानवी संस्कृतीचा इतिहास' (१९३१), 'प्राच्य आणि पाश्चात्त्य नीतिध्येये' (१९३७), 'आनंदीबाई पेशवे' (१९४०), 'मराठी साहित्यातील उपेक्षित मानकरी' (१९५७), 'कोशकार केतकर' (य.रा.दाते ह्यांच्या सहकार्याने, १९५९) यांसारखी पुस्तके लिहिली. शिवाय निरनिराळ्या नियतकालिकांतून भाषा, वाङ्मय, इतिहास, संस्कृती आदी विषयांवर चारशेहून अधिक लेख लिहिले. कर्वे यांच्या लेखनात माहितीचा अचूकपणा, मांडणीचा नेटकेपणा जाणवतो. दुर्मिळ परंतु अभ्यासकांना उपयुक्त वाटणारा वा.शि.आपटे यांचा संस्कृत-इंग्रजी कोश पुनर्मुद्रित करण्याच्या कामी कर्वे-दाते यांनी डॉ. परशुरामपंत गोडे या संस्कृत पंडिताचे साहाय्य मिळविले. नवीन भर घालून हा कोश त्यांनी प्रकाशित केला. त्याप्रमाणे आपटे यांचाच इंग्रजी-संस्कृत कोश पुनर्मुद्रित करण्याचा कर्वे यांचा हेतू होता परंतु कर्वे यांच्या निधनामुळे तो संकल्प यशस्वी होऊ शकला नाही. 'कोशकार्य सर्वसमावेशक दृष्टी ठेवून अनाग्रही बुद्धीने करावे लागते' ही डॉ. केतकरांची भूमिका कर्वे यांच्या कार्यातून प्रत्ययास येते.

महाराष्ट्राचे सांस्कृतिक जीवन उंचावणार्या अनेक कार्यांत कर्वे आपुलकीने लक्ष घालीत. महाराष्ट्र साहित्य परिषदेची धुरा त्यांनी अनेक वर्षे संभाळली. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या चिटणीस पदावरही ते होते. भारत इतिहास संशोधक मंडळाचे कर्वे हे दहा वर्षे चिटणीस होते. पुणे विद्यापीठाच्या सदस्य मंडळावर ते होते. ग्रंथ प्रकाशन आणि प्रकाशन अनुदान समितीत ते कार्यरत होते. सरकारच्या पेशवे दप्तर समितीचे सदस्यही ते होते. आपल्या कोशांच्या रूपाने कर्वे सर्वत्र दिसत राहतील.

**क्लिक...क्लिक...!**



**उरण : मागील ५० वर्षांपासून प्रतीक्षेत असलेल्या उरणकरांच्या स्वप्नांचा मार्ग आता दृष्टिपथात येऊ लागला आहे. २७ किमी लांबीच्या नेरूळ-उरण मार्गावरील दुसऱ्या टप्प्यातील खारकोपर ते उरण या १४.३ किमी लांबीच्या रेल्वेमार्गावरील काम प्रगतिपथावर आहे.**

## आरोग्य प्रहर

## निद्रानाश टाळण्यासाठी जाणून घ्या आयुर्वेदिक पद्धत

अनेकांना निद्रानाशाची समस्या असते. कधी कधी खूप प्रयत्न करूनही झोप येत नाही. आली तरी मध्येच तुटते. निद्रानाशामुळे आरोग्याशी संबंधित अनेक समस्या उद्भवू शकतात. जसे की लठ्ठपणा, उच्च रक्तदाब, मधुमेह आणि कमकुवत प्रतिकारशक्ती... अशा स्थितीत झोपेशी संबंधित आयुर्वेदाचा सिद्धांत प्रभावी ठरू शकतो.



आयुर्वेदानुसार झोप ही केवळ शरीर आणि मनाच्या विश्रांतीसाठी आवश्यक नाही तर ती शरीराला डिटॉक्सिफाय करते. आयुर्वेदानुसार झोप ही अशी अवस्था आहे ज्यामध्ये आपण आपल्या सर्व इच्छांपासून दूर जातो. यामुळे शरीर आणि मनाला विश्रांती मिळते आणि थकवा दूर होतो. आयुर्वेद सांगतो की झोपेमुळे शरीराच्या अंतर्गत ऊतींवर आणि सर्व अवयवांवर सकारात्मक परिणाम होतो. चांगली झोप घेतल्यावर ताजेतवाने वाटते.

निद्रानाशाची अनेक कारणे असू शकतात डॉ. सुभाष एस. मार्कंडेय सांगतात की जर एखाद्याला निद्रानाशाची समस्या असेल तर सर्वप्रथम त्याने आपली दिनचर्या निश्चित करावी. झोपण्याची आणि उठण्याची वेळ ठरलेली असावी. उदाहरणार्थ, जर कोणी दिवसा झोपत असेल तर त्याला आळशी वाटते. त्याचप्रमाणे वेळेवर झोप न आल्यास संपूर्ण संतुलन बिघडते. जर तुम्ही कमी झोपत असाल किंवा रात्री मध्येच उठत असाल तर ऊती कोरड्या होऊ शकतात. त्याचप्रमाणे जर तुम्ही जास्त झोपत असाल तर हाडांशी संबंधित समस्या उद्भवू शकतात. डॉ. सुभाष एस. मार्कंडेय लिहितात की साधारणपणे उन्हाळ्यातच दिवसा झोपावे, कारण उन्हाळ्याचे दिवस मोठे असतात, तेही लहान मुले, वृद्ध किंवा आजारी व्यक्तींसाठी.

दिनचर्या निश्चित करा, जेणेकरून शरीरचक्र सुरळीत होईल.

पचन आणि झोप यांचा खोल संबंध आहे. जर तुम्ही संध्याकाळी जड जेवण केले तर ते तुमची पचन प्रक्रिया मंदावते आणि तुमची झोपेमध्ये व्यत्यय आणते.

नेहमी रात्रीचे जेवण झोपण्याच्या किमान तीन तास आधी करण्याचा प्रयत्न करा.

आयुर्वेदानुसार तुम्ही एक कप गरम गाईचे दूध किंवा खीर खाऊ शकता, किंवा एखादे गाणे ऐकू शकता किंवा झोपण्यापूर्वी पायांना हलका मसाज करू शकता. ते वात संतुलित करते.

आयुर्वेदानुसार ३-२-१ फॉर्म्युला निद्रानाश किंवा झोपेच्या समस्यांपासून मुक्त होण्यासाठी खूप प्रभावी आहे. झोपण्याच्या किमान तीन तास आधी जेवण करा, झोपण्याच्या दोन तास आधी टीव्ही, मोबाईल, लॅपटॉप आणि इतर गॅजेट्स बाजूला ठेवा.

# पालकमंत्र्यांनी घेतली आढावा बैठक

## विविध विषयांवर सविस्तर चर्चा; पत्रकार परिषदेत दिली माहिती

**अलिबाग : प्रतिनिधी**

राज्याचे उद्योगमंत्री तथा रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत यांनी गुरुवारी (दि. १५) अलिबाग येथे जिल्हास्तरीय आढावा बैठक घेतली. या वेळी विविध विषयांवर चर्चा झाली. याबाबतची माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली.



जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या आढावा बैठकीस आमदार महेंद्र दळवी, जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, मुख्य कार्यकारी अधिकारी किरण पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी पद्मश्री बैनाडे, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे उपस्थित होते.

या वेळी जिल्ह्यातील विविध विभागांचे खातेप्रमुख उपस्थित होते. जिल्हा परिषदेकडे ४६, तर प्रशासनाकडे ८३ विविध खात्यांचे प्रश्न आले आहेत. ६८ प्रश्न कपात सूचना संदर्भातील आहेत. यावर चर्चा झाली.

या प्रश्नांसंदर्भात अधिकाऱ्यांची पूर्ण तयार ठेवावी. विधानसभा स्तरावर जिल्ह्याशी निगडीत येणाऱ्या प्रश्नाची योग्य उत्तरे दिली जावीत, त्याचा सविस्तर अहवाल आणि माहिती पालकमंत्र्यांकडे यायला हवा, असे निर्देश जिल्हा प्रशासनाला दिले असल्याचे ना. उदय सामंत यांनी सांगितले.

पालकमंत्री म्हणून गेल्या महिन्यात जनता दरबार होता. या जनता दरबारात २४९ अर्ज प्राप्त झाले होते. यातील १४१ अर्जांची पूर्तता झाली. अद्याप १०८ अर्जांची पूर्तता बाकी आहे. पुढच्या महिन्यातील जनता दरबाराअगोदर यातील ९० टक्के अर्जांची पूर्तता करून निकाली निघायला हवेत, अशा सूचना जिल्हा प्रशासनाला दिल्याचे त्यांनी सांगितले.

अलिबाग येथील जिल्हा न्यायालयाला आज भेट दिली. त्यांच्या भौतिक सुविधांसंदर्भातील अडचणी समजून घेतल्या. वकील बार कॉन्सिलसाठी आवश्यक कक्षासाठी जिल्हा नियोजन विकास योजनेतून निधी देण्याचा निर्णय घेतला. कामगार न्यायालयासाठी अडीच हजार चौरस फुटाची जागा आवश्यक आहे. त्यासाठी लागणारा निधीही जिल्हा नियोजन विभागामार्फत देण्याचा निर्णय घेण्यात आला. महाड न्यायालयाचे पुरात नुकसान झाले होते. त्याला आपदग्रस्त निधीतून लागणारा निधी देण्याचा निर्णय घेतला. एकूण दीड कोटी रुपयांचा निधी जिल्हा नियोजन विभागामार्फत या कामांसाठी दिला जाणार आहे. याचबरोबर तळोजा कारागृहातील पायाभूत सुविधांसाठी दोन कोटी रुपयांचा निधी दिला जाणार असल्याची माहिती उदय सामंत यांनी दिली.

### आंबेत पुलाचे काम सुरू करण्याचे निर्देश

**रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यांना जोडणाऱ्या आंबेत पुलाचे काम तातडीने सुरू व्हावे या संदर्भातील आदेश संबधित विभागांना दिले आहेत. कोणी कितीही श्रेय घेण्याचा प्रयत्न केला तरी हे काम माझ्या पाठपुराव्यानंतर सुरू होणार आहे. आंबेत ते म्हाप्रळदरम्यान फेरी बोटसेवेतून एसटी बस सेवेला प्रवास करण्यास अनुमती देण्याबाबत चर्चा झाली, मात्र मुंबईत झालेल्या बैठकीत प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीने सध्या तरी हा निर्णय घेण्यात आलेला नाही. जोवर परिवहन विभाग, पोलीस विभाग आणि जिल्हाधिकारी यांचे समाधान होत नाही तोवर हा निर्णय घेता येणे शक्य नसल्याचे पालकमंत्री उदय सामंत यांनी या वेळी सांगितले.**

# श्रीवर्धनमध्ये सहलींच्या संख्येत लक्षणीय वाढ

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

दोन वर्षे कोरोना महामारीने थैमान घातले होते. त्याकाळात निर्बंधामुळे शाळा, महाविद्यालयांच्या सहली बंद ठेवण्यात आल्या होत्या. आता निर्बंध हटविण्यात आल्यामुळे श्रीवर्धन तालुक्यात शालेय, महाविद्यालयीन सहलींच्या संख्येत लक्षणीय वाढ झाल्याचे पहायला मिळत आहे.

राज्याच्या विविध भागांमधून एसटी अथवा खाजगी बसेस घेऊन अनेक शाळा त्याचप्रमाणे महाविद्यालयांचे विद्यार्थी व शिक्षक शैक्षणिक सहली घेऊन श्रीवर्धन तालुक्याला भेटी देत आहेत. श्रीवर्धनचा स्वच्छ व सुंदर समुद्र किनारा, निसर्गरम्य ठिकाणे, श्रीक्षेत्र हरिहरेश्वर तसेच दिवेआगर येथील सुवर्ण गणेश मंदिर पाहण्यासाठी शैक्षणिक सहलीच्या निमित्ताने अनेक विद्यार्थी व विद्यार्थिनी या ठिकाणी येत आहेत. एका शाळेच्या किंवा महाविद्यालयाच्या सहलीच्या चार ते पाच गाड्या येत असल्याने श्रीवर्धन शहरातील अरुंद रस्त्यावरती वाहतूक कोंडी झाल्याचेदेखील पाहायला मिळत आहे.

पुर्वी श्रीवर्धनमधील हॉटेलमध्ये किंवा केटरिंगवाल्याकडे आगाऊ ऑर्डत देवून सहलीतील विद्यार्थ्यांच्या जेवणाची सोय करून ठेवत असत. परंतु सध्या त्याचा ट्रेंड बदललेला पाहायला मिळतो. अनेक शाळांचे शिक्षक सोबत आचारी तसेच जेवण बनवण्याचे साहित्य घेऊन सहल आयोजित करत असल्याचे पाहायला मिळत आहे. श्रीवर्धन समुद्र किनाऱ्याजवळ मठाच्या स्मशानभूमीजवळ अवधूताचे मंदिर आहे. या ठिकाणी डांबरीकरण केलेले खूप मोठे मैदान अस्तित्वात आहे. हे मैदान दशक्रिया विधी, पिंडदान आदी उत्तरकार्यासाठी राखीव असतानादेखील अनेक सहलीच्या गाड्या या ठिकाणी उभ्या करून ठेवल्या जातात. तसेच सहल घेऊन आलेल्या आयोजकांकडून या ठिकाणी जेवण बनविण्याचे उद्योगही सुरू असतात. श्रीवर्धन नगर परिषदेने या ठिकाणी सूचनाफलक लावून या जागेमध्ये गाड्या पार्किंग करणे व जेवण बनवण्यास मज्ञाव करावा, अशी मागणी श्रीवर्धन शहरातील नागरिकांकडून केली जात आहे.

# मुरूडमध्ये ग्रामपंचायत निवडणुकीसाठी प्रशासनाची तयारी; मतदान साहित्य सीलबंद

**मुरूड : प्रतिनिधी**

तालुक्यात रविवारी होणाऱ्या चार ग्रामपंचायतीच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गुरुवारी (दि. १५) १२ कंट्रोल युनिट आणि १७ बॅलेट युनिट सीलबंद करण्यात आले आहेत. शनिवारी सकाळी या मशीन मतदान केंद्रावर पाठविल्या जाणार आहेत. त्यासाठी वाहतूक व्यवस्था करण्यात आली असल्याची माहिती मुरूडचे नायब तहसीलदार रवींद्र सानप यांनी दिली.



मुरुड तालुक्यातील पाच ग्रामपंचायतीचा निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला होता. त्यामधील तेलवडे ग्रामपंचायत बिनविरोध झाल्याने उर्वरित चार ग्रामपंचायतीमध्ये येत्या रविवारी मतदान प्रक्रिया होणार आहे. त्यामुळे तेथे निवडणूक विभागाची लगबग सुरू आहे. या पार्श्वभूमीवर गुरुवारी इलेक्ट्रॉनिक वोटिंग मशीन सीलबंद करण्यात आल्या. मुरूडचे तहसीलदार रोहन शिंदे, निवडणूक नायब तहसीलदार अमित पुरी, नायब तहसीलदार गोविंद कोटंबे यांच्यासह अधिकारी व उमेदवार या वेळी उपस्थित होते.

# अलिबागच्या बहिरोळेत बिबट्याकडून कुत्र्याची शिकार

**अलिबाग : प्रतिनिधी**

तालुक्यात बिबट्याचा वावर असल्याचे अनेकदा समोर आले आहे, याला वनखात्याचासुद्धा दुजोरा आहे. ९ डिसेंबर रोजी अलिबाग तालुक्यातील बहिरोळे गावात बिबट्याने एका कुत्र्याला उचलून नेल्यानंतर बुधवारी (दि. १४) रात्री आणखी एका कुत्र्यावर बिबट्याने हल्ला केल्याची माहिती ग्रामस्थांनी दिली.

अलिबाग तालुक्यातील कोळगाव येथे बिबट्या दिसल्याची पहिली घटना समोर आली. गावातील गुरावर बिबट्याने हल्ला केल्याचे सांगण्यात आले. त्या नंतर आरसीएफच्या परिसरात गस्त घालताना बिबट्या जाळीत दिसला. आरसीएफ व्यवस्थापन आणि वनाधिकारी यांनी या घटनेला दुजोरा दिला. त्यामुळे बिबट्याची दहशत वाढत गेली.

कनकेश्वरच्या पायथ्याशी शुक्रवारी बिबट्याने एका कुत्र्याची शिकार केली होती. तर बुधवारी रात्री एका कुत्र्यावर हल्ला केला, त्यात तो गंभीर जखमी झाला. अखेर त्याचा मृत्यू झाला. या घटनेची खबर वनाधिकारी पंकज घाडी यांना देण्यात आली. त्यांनी घटनास्थळी येऊन पाहणी केली. यावेळी बहिरोळे गावचे पोलीस पाटील प्रफुल्ल थळे आणि ग्रामस्थ उपस्थित होते. घाडी यांनी ग्रामस्थांशी संवाद साधून जागरूक राहण्याचे मार्गदर्शन केले. बिबट्याचा वाढता वावर आणि दहशतीतून ग्रामस्थांची सुटका करावी, बिबट्याचा बंदोबस्त करावा असे पत्र मापगाव ग्रामपंचायत आणि ग्रामस्थ यांच्या वतीने वनखात्याच्या अधिकाऱ्यांना देण्यात आले आहे.

अलिबाग, मुरूड, कर्जत तालुक्यातील गावांमध्येही बिबट्याची दहशद वाढत आहे. काही लोक त्याला अफवा समजत आहेत तर काही बिबट्या दिसल्याचा दावा करत आहेत. मग गुरे आणि कुत्र्यावर होणारे हल्ले कोणता प्राणी करतो, असा प्रश्न उभा राहतो.

# काकळघरमध्ये शिंदे गटाचे वर्चस्व

## कोर्लई ग्रामपंचायतीत अटीतटीची लढत

**रेवदंडा : प्रतिनिधी**

कोर्लई व काकळघर ग्रामपंचायतीची सार्वत्रिक निवडणूक येत्या १८ डिसेंबरला होत आहे. काकळघर ग्रामपंचायतीत शिंद गटाचे वर्चस्व असल्याचे चित्र दिसते. तर कोर्लई ग्रामपंचायतीत अटीतटीची लढत होणार आहे.

काकळघर ग्रामपंचायतीत शिंदे गट व शेकापक्ष याच्यामध्ये लढत आहे, थेट सरपंचपदासाठी तिरंगी लढत होत असून, शिंदे गटाकडून स्वस्तिक चक्रधर ठाकूर, शेकापचे मोहनिष मनोहर ठाकूर आणि भाजपचे किसन पाडुरंग किंजले निवडणुक लढवित आहेत. काकळघर ग्रामपंचायतीमध्ये शिंदे गटाचे प्राबल्य दिसत असून स्वतिक चक्रधर ठाकूर यांचेसाठी निवडूक सोपी असल्याचे चित्र आहे.

काकळघर ग्रामपंचायत सदस्य पदासाठी शिंदे गटाकडून प्रभाग एक मधून हर्षला हरिभाऊ आग्री, मंगेश हरिभाऊ कुलवे आणि सुदेश पाडावे, प्रभाग दोनमधून निशांत दत्तात्रेय दांडेकर, काळी नामदेव ठाकूर, सुरक्षा सुरेश ठाकूर आणि प्रभाग तीनमधून उषा जानू ठाकूर, रसिका गणेश थळे व पल्लवी रामचंद्र भोईर हे उमेदवार देण्यात आले आहेत. तर शेकापच्या वतीने प्रभाग एकमधून निशा नरेश तेरेकर, नरेश मधूकर बडवे, मनोहर पाडुरंग मेहत्तर मयुर मनोहर ठाकूर, प्रभाग क्रमाक दोनमधून मंगेश महादेव जोगत, नीलम जगदीश ठाकूर, पुष्पा प्रमोद मेहत्तर आणि प्रभाग तीनमधून गोंविद लक्ष्मण ठाकूर, संपदा संतोष कांबळी, व रूपाली मंगेश महाडिक हे निवडणूक लढवित आहेत.

कोर्लई ग्रामपंचायतीच्या थेट सरपंच पदासाठी दिपाली प्रमोद म्हात्रे (शिंदे गट), राजश्री प्रशांत मिसाळ (उध्दव ठाकरे गट), अलका मनोहर पाटील (अपक्ष) व नेत्रा जगदीश भोय (शेकाप) यांच्यात चौरंगी लढत होत आहे.

ग्रामपंचायत सदस्य पदासाठी प्रभाग एकमधून वेरोनिका डायगो मार्तिस, रेश्मा रमेश मिसाळ, गोविंद चंदर वाघमारे, उपेंद्र दत्ताराम बलकवडे, रूझारियो सुनंदा कैतान, दिलिप श्रावण वाघमारे, दयानंद दत्ताराम पाटील व प्रभाग दोनमधून जयेश दिलिप म्हात्रे, कविता संतोष सतविडकर, यशोधा श्रावण वाघमारे, सारिका गोंविद वाघमारे, रंजना संतोष बलकवडे आणि प्रभाग तीनमधून जितेंद्र नारायण पाटील, जयश्री भगिरथ पाटील, योगेश महादेव पाटील, लतिका प्रकाश बलकवडे, अनंता दत्ताराम पाटील, यशोधा श्रावण वाघमारे, जना कृष्णा वाघमारे, जागृती रोशन पिटकूर हे आपले नशीब आजमावत आहेत.

# खरोशी फाटा येथे दुचाकीचा अपघात; दाम्पत्य जखमी

**पेण : प्रतिनिधी**

तालुक्यातील दादर सागरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत खरोशी फाटा येथे दुचाकींचा अपघात होऊन या अपघातात दांपत्य जखमी झाले आहे.

किशोर वसंत बेंडल (वय ३०, कुरार व्हिलेज, मालाड-मुंबई) हा आपल्या ताब्यातील टीव्हीएस ज्युपिटर मोटरसायकल(एमएच-४७,बीएफ-६२५६) चालवित मालाड येथून मुरूड येथे मुंबई-गोवा महामार्गाने जात होता. पेण तालुक्यातील जिते गावच्या हद्दीत खरोशी फाटा येथे किशोर बेंडल याचा गाडीवरील ताबा सुटून गाडी गतिरोधकवरून स्लीप झाली व अपघात झाला. या अपघातामध्ये किशोर बेंडल व त्याची पत्नी अंकिता किशोर बेंडल (वय २५) हे गंभीर जखमी झाले.

या अपघाताची नोंद दादर सागरी पोलीस ठाण्यात करण्यात आली असून अधिक तपास महिला हवालदार सारिका पाटील करीत आहेत.


अ‍ॅड. रोशनी सु. ठाकूर
अ‍ॅड. सुशांत डी. पाटील

### जाहीर नोटीस

**कल्याण येथील मे. दिवाणी न्यायाधीश व. स्तर यांचे कोर्टात**

दि. चौ. अर्ज. क्र. १०३६/२०२२

**१. श्री. गणेश रामा पितळे,**
वय- ५४ वर्षे, व्यवसाय- शेती
**२. श्री. नरेश रामा पितळे,**
वय- ५२ वर्षे, व्यवसाय-शेती
**३. श्री. भानुदास रामा पितळे,**
वय- ५० वर्षे, व्यवसाय- शेती
**४. श्री. शिशुनाथ रामा पितळे,**
वय- ४९ वर्षे, व्यवसाय- शेती
**५. श्री. हरेश रामा पितळे,**
वय- ४७ वर्षे, व्यवसाय- शेती
वरील १ ते ५
रा. पोसरी, ता. अंबरनाथ, जि. ठाणे,
**६. श्रीम. मंदाबाई रमेश खाणे,**
वय- ६० वर्षे, व्यवसाय- गृहिणी रा. ३९, कल्याण शिल रोड, दावडी गाव, ता. कल्याण, जि. ठाणे,
**७. श्रीम. नंदाबाई अशोक थारवे,**
वय- ५७ वर्षे, व्यवसाय- रा. आनंदनगर, पालेगाव, ता. अंबरनाथ, जि. ठाणे,
**८. श्रीम. मनिषा भगवान ठाकूर,**
वय- ४५ वर्षे, व्यवसाय-
रा. शिरवली, ता. पनवेल, जि. रायगड,
**९. श्रीम. सिताबाई रामा पितळे**
वय - ८० वर्षे, व्यवसाय-
रा. पोसरी, ता. अंबरनाथ, जि. ठाणे,
} अर्जदार

सदर जाहीर नोटीशीद्वारे तमाम लोकांना कळविण्यात येते की,

१. कै. महादू आंबो पितळे यांचा वारस म्हणून दाखला मिळणेकरीता मे. दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, उल्हासनगर यांचे कोर्टात चौकशी अर्ज क.१०३६/२०२२ वरील अर्जदार १ ते ९ यांनी अर्ज दाखल केला आहे.

२. कै. महादू आंबो पितळे हे दि. २०/०७/१९८६ रोजी अर्जदार ह्यांचे काका मौजे पोसरी, ता. अंबरनाथ, जि. ठाणे येथे मयत झाले आहेत. त्यांचे वारस म्हणून वरील अर्जदार हे वारस आहेत. कै. महादू आंबो पितळे हे अविवाहीत मयत आहेत. त्यांच्या नावे खालीलप्रमाणे जमिन मिळकत आहे. यांच्या जमिनमिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे पोसरी, ता. अंबरनाथ, जि. ठाणे**

| अ.नु. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे. आर. पॉ | पो. ख हे. आर . पॉ | आकार |
|---|---|---|---|---|---|
| | ५९ | १ | १.३८.९० | ०.२८.८० | १९.४४ |
| | ६१ | २ | १.२९.०० | ०.७७.०० | २.४४ |

वरील मिळकतीस यापुढे सोईकरीता ''सदर मिळकत'' म्हणुन संबोधण्यात येईल.

३. अर्जदार यांनी वरील मिळकतीच्या सातबारा सदरी कै. महादू आंबो पितळे यांचे वारस म्हणून नोंदणी करणेकरीता तलाठी कार्यालय पोसरी/तहसील कार्यालय अंबरनाथ येथे अर्ज केला होता. परंतु संबंधीत कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी अर्जदार यांना तोंडी कळवून समक्ष न्यायालयाकडून कै. महादु आंबो पितळे यांचे वारस असलेबाबतचा दाखला आणण्यास सांगितले. सबब अर्जदार यांचे नावे वारसदाखला देणेत यावा याकरीता अर्ज केलेला आहे.

४. सदर चौकशी अर्जामधील नमुद अर्जदार हे कै. महादु आंबो पितळे यांस कायदेशीर वारस आहे अशी त्यांनी मागणी केली आहे.

६. सदर चौकशी अर्जास कोणाचीही हरकत. हक्क व अधिकार अगर वारसा असेल त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाले पासून एक महिन्याचे आत किंवा दि. २१/१२/२०२२ रोजी सकाळी १०.३० वा. मे. दिवाणी न्यायाधिश व स्तर. कल्याण यांचे न्यायालयात आपल्या हरकती योग्य त्या पुराव्यासह सादर कराव्यात. सदर नोटीस प्रसिद्ध झाले पासून योग्य त्या मुदतीत कोणाच्याही हरकती न आल्यास, कोणाचीही हरकत नाही असे समजून सदरील कोर्ट अर्जदार यांस वारस दाखला देईल याची नोंद घेण्यात यावी.

आज दि. १७/११/२२ रोजी आमचे सहीने मे, कोर्टाच्या शिक्क्यासह दिले.

**सही/-**
**क. लिपीक**
**दिवाणी न्यायालय**
**वरिष्ठ स्तर कल्याण**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय**
**वरिष्ठ स्तर कल्याण**


# गोवर रुबेला लसीकरण मोहिमेस सहकार्य करण्याचे आवाहन

**अलिबाग : जिमाका**

जिल्हा परिषद आरोग्य विभागाकडून गोवर रुबेला लसीकरणासाठी १५ ते २५ डिसेंबर २०२२ आणि १५ ते २५ जानेवारी २०२३ या कालावधीत जिल्ह्यामध्ये विशेष मोहीम राबविली जाणार आहे. या विशेष मोहिमेत आरोग्य विभागाकडून २६ जानेवारी २०२३ पर्यंत सर्व लाभार्थी मुलांचे लसीकरण पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले असून लसीकरण करण्यासाठी जिल्ह्यामध्ये पथके कार्यरत करण्यात आली असल्याची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुधाकर मोरे व जिल्हा माताबालसंगोपन अधिकारी डॉ. प्रताप शिंदे यांनी दिली आहे.

या विशेष लसीकरण मोहिमेत नऊ महिने ते पाच वर्ष वयोगटातील डोस देण्याचे राहिलेल्या मुलांना घरोघरी सर्वेक्षण करून नजिकच्या लसीकरण केंद्रावर लसीकरण करण्यात येणार आहे. यामध्ये शिल्लक राहिलेला पहिला किवा दुसरा डोस देण्यात येणार आहे. त्यानुसार जिल्हा परिषद आरोग्य विभागाकडून पूर्व तयारी करण्यात आली आहे. तसेच जिल्ह्यात ७४ विशेष लसीकरण सत्र आयोजित करण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे नियमित एक हजार ७६० लसीकरण सत्रामध्ये गोवर लसीकरण केले जाईल.

सर्वेक्षणात जिल्ह्यात आरोग्य विभागाकडे एकूण नऊ महिने ते पाच वर्षाच्या आतील डोस राहिलेल्या मुलांची संख्या ६७० पहिला डोस व दुसरा डोस राहिलेल्या लाभर्थ्यांची संख्या एक हजार ९७९ आहे. या सर्वाचे लसीकरण या मोहिमेच्या माध्यमातून करण्यात येणार आहे.

नागरिकांनी आपल्या घरातील नऊ महिने ते पाच वर्ष वयोगटातील बालकांचे गोवर रुबेला लसीकरण झाले नसल्यास तत्काळ नजिकच्या आंगणवाडी केंद्र, आरोग्य केंद्राकडे संपर्क करुन लसीकरणासाठी आरोग्य विभागाला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुधाकर मोरे, जिल्हा माताबालसंगोपन अधिकारी डॉ. प्रताप शिंदे आणि अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अशोक कटारे यांनी केले आहे.


### पनवेल महानगरपालिका
### जाहीर नोटीस सूचना

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८(३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | झाडांचा प्रकार व संख्या | झाडे तोडण्याचे कारण |
|---|---|---|---|
| १ | ट्रायसिटी रिअल्टी एल. एल. पी तर्फे अर्जुन रेखी १००१/०२. भुमिराज कोस्टारिका, प्लॉट नं. १-२, सेक्टर १८, पाम बिच रोड, सानपाडा (ई), नवी मुंबई ४००७०५ | ०२ जंगली, ०१ बदाम, ०१ भेंडी व ०१ शेगट (शेवगा) अशी एकुण ०५ झाडे तोडणी करणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्लॉट नं १००, सेक्टर- १६E. कळंबोली पनवेल सदर मिळकतीत आम्ही पनवेल महानगर पालिकेकडून बांधकाम परवानगी घेऊन इमारत बांधकाम करणार आहोत, परंतु सदर मिळकतीतील झाडे इमारत बांधकामास अडथळा निर्माण करणारी आहेत. |
| २ | ट्रायसिटी रिअल्टी एल. एल. पी तर्फे अर्जुन रेखी, १००१/०२, भुमिराज कोस्टारिका, प्लॉट नं. १-२, सेक्टर १८. पाम बिच रोड, सानपाडा (ई). नवी मुंबई ४००७०५ | ०७ रेन ट्री, ०१. गुलमोहर, ०१ उंबर, ०२ जंगली व ०२ विलायती चिंच अशी एकुण १३ झाडे तोडणी करणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्लॉट नं-४A, सेक्टर- २१, नवीन पनवेल (प), सदर मिळकतीत आम्ही पनवेल महानगर पालिकेकडून बांधकाम परवानगी घेऊन इमारत बांधकाम करणार आहोत, परंतु सदर मिळकतीतील झाडे इमारत बांधकामास अडथळा निर्माण करणारी आहेत ती झाडे तोडण्यास आपण परवानगी द्यावी. |
| ३ | प्रोप्रा. मे. आदित्य कंन्स्ट्रक्शन्स. मुखत्यारी श्री. रणछोडजी देवस्थान ट्रस्ट श्री. अरविंद महादेव सावळेकर, भु.क्र.८१७,८१८ व अ.भु.क्र.२५५ व २५६ टपाल नाका, पनवेल | ०१ आंबा, ०१ पिंपळ, ०१ औदुंबर ०१ जांभुळ व ०२ बदाम अशी एकुण ०६ झाडे तोडणी करणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील भु.क्र.८१७, ८१८ व अ.भु.क्र. २५५ व २५६ टपाल नाका, पनवेल येथे ०६ झाडे ही नवीन इमारत बांधकाम करणेस अडथळा निर्माण करीत असल्याने सदरील ०६ झाडे तोडण्याची परवानगी द्यावी. |
| ४ | श्री. त्रिशुल म्हात्रे, मंगलमूर्ती कंन्स्ट्रक्शन, ऑफिस नं. १०४. पहिला मजला, वृंदावन हाईट्स, बापट वाडा, टिळक रोड, पनवेल | ०१ आंबा. ०१ बेल, ०२ नारळ अशी एकुण ०४ झाडे तोडणी करणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्लॉट नं ६२/१३, ६२/१४, ६२/१५. जुना ठाणा नाका रोड, पनवेल येथे ०४ झाडे ही नवीन इमारत बांधकाम करणेस अडथळा निर्माण करीत असल्याने सदरील ०४ झाडे तोडण्याची परवानगी द्यावी. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. विहित मुदतीत सादर न झालेल्या हरकती अगर सूचनेचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

जा.क्र. पमपा/ उद्यान/२१२२/प्र.क्र.१०५/७४४/२०२२
दिनांक : १५/१२/२०२२

**सही /-**
**उपायुक्त**
**पनवेल महानगरपालिका**

निवडक



## उरण येथे अय्यप्पा पूजा कार्यक्रम

**उरण** : सालाबादप्रमाणे यंदाही श्री अय्यप्पा कल्चरल असोसिएशनच्या वतीने शनिवारी (दि. १७) श्री राघोबा मंदिर कोटनाका येथे अय्यप्पा पुजेचे आयोजन करण्यात आले आहे. यंदाचे ३२वे वर्ष आहे, असे श्री अय्यप्पा कल्चरल असोसिएशनचे सेक्रेटरी गोपाकुमार ए. यांनी सांगितले. या कार्यक्रमात पहटे ५ वाजता गणपती होम, सकाळी ६.३० वाजता अय्यप्पा देवाची प्राणप्रतिष्ठा, सकाळी ७.३० वाजता उषा पूजा, ११.३० वाजता मध्य पूजा, दुपारी १२ ते ३ वाजेपर्यंत महाप्रसाद, रात्री ८.३० वाजता आथाझा पूजा, रात्री ९.३० वाजता महादिप आराधना, १०.३० वाजता हरीवर्सानम आदीचे आयोजन करण्यात आले आहे.

## रेल्वेच्या धडकेने एकाचा मृत्यू

**पनवेल** : पनवेल रेल्वेस्टेशन ते कळंबोली रेल्वेस्टेशन दरम्यान गोरखपूर एक्स्प्रेस गाडीची धडक लागून एका अनोळखी व्यक्तीचा मृत्यू झाला. याप्रकरणी पनवेल रेल्वे पोलीस मृताच्या नातेवाईकाचा शोध घेत आहे. मृत व्यक्तीचे अंदाजे वय ४५ वर्षे असून उंची पाच फूट एक इंच, रंग गहूवर्ण, पुढील बाजूने अर्धवट टक्कल, तसेच अंगात निळ्या सफेद व भगव्या रंगाचा हाफ टी शर्ट आणि जिन्स पेन्ट आहे. या व्यक्तीबाबत कोणालाही काही माहिती असल्यास पनवेल रेल्वे पोलीस ठाणे (फोन नं. ०२२ –२७४६७१२२) किंवा सहा पोलीस निरीक्षक बी. व्ही. दोडमिसे (मो.९५०३७५८२८४) यांच्याशी संपर्क साधावा.

## तुर्भे येथे जलवाहिनी फुटल्याने पाणी वाया

**नवी मुंबई** : तुर्भे स्टोअर परिसरात पाणीपुरवठा करणारी वाहिनी गेल्या चार ते पास दिवसांपासून फुटलेली आहे. याबाबत पालिकेकडे तक्रार करून वाहिनीची दुरुस्ती झालेली नाही. त्यामुळे हजारो लिटर पाणी वाया जात असून तुर्भे स्टोअर, इंदिरा नगर, गणपती पाडा, हनुमान नगर, आंबेडकर नगर यांसह तुर्भे परिसरातील अनेक भागांमध्ये पाण्याची समस्या भेडसावत आहे. पिण्याच्या पाण्यासाठी येथील रहिवाशांना चार ते पाच तास थांबून राहावे लागत आहे. आधीच या ठिकाणी पाणीपुरवठा अनियमित होत आहे. अशातच जलवाहिनी फुटल्याने कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याने स्थानिक रहिवासी त्रस्त आहेत. मनपा प्रशासनाकडे तक्रारी दाखल करूनही वाहिन्यांची दुरूस्ती होत नसल्याने नागरिकांकडून संताप व्यक्त केला जात आहे.

### ५० वर्षांच्या प्रतीक्षेनंतर उरणकरांचे स्वप्न होणार साकार

# नेरूळ-उरण मार्गावर २०२३मध्ये रेल्वे धावणार



**उरण : वार्ताहर**

मागील वर्षांपासून प्रतिक्षेत असलेल्या उरणकरांच्या स्वप्नांचा मार्ग आता दृष्टीपथात येऊन ठेपला आहे. २७ किमी लांबीचा आणि सुमारे एक हजार ७८२ कोटी खर्चाच्या नेरूळ-उरण मार्गावरील दुसऱ्या टप्प्यातील खारकोपर ते उरण हा १४.३ किमी लांबीच्या रेल्वे मार्गावरील काम प्रगतीपथावर आहे. त्यामुळे उरणकरांमधून समाधान व्यक्त होत आहे.

सर्वच अडथळे दूर झाल्यानंतर १.२ किमी लांबीचा जासई उड्डाणपुलाच्या रखडलेल्या कामालाही जोरदार सुरुवात झाली आहे. नेरूळ-उरण मार्गावरील उरण हे शेवटचे स्टेशन आहे. या शेवटच्या उरण स्टेशनाचे कामही वेगात सुरू आहे. नेरूळ-उरण रेल्वे मार्गावर प्रवासी वाहतूक सुरू करण्यासाठी मध्यरेल्वे प्रशासनाने फेब्रुवारी २०२३ची पुन्हा एकदा डेडलाईन दिली आहे. त्यामुळे ५० वर्षांपासून उरणकरांनी रेल्वे सुरू होण्याचे पाहिलेले स्वप्न २०२३मध्ये सत्यात उतरणार आहे. यामुळे उरणकरांसाठी विकासाचे आणखी एक दालन खुले होणार आहे.

## खारघरमध्ये कार चोरीची घटना ‘सीसीटीव्ही’त कैद



**पनवेल : वार्ताहर**

खारघर येथील सिडकोच्या वसाहतीतील एका कारची चोरी होतानाची घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. सिडकोने वसाहतींमध्ये लावलेले सीसीटीव्ही कॅमेरे सध्या वेलपर्णीमुळे विळख्यात अडकल्याने चोरट्यांचे फावले आहे. त्यामुळे चोरट्यांना कसे पकडावे असा प्रश्न तपास यंत्रणांसमोर उभा राहिला आहे.

खारघर वसाहतीतील सेक्टर १०मधून नुकतेच पहाटेच्या सुमारास सफेद रंगाची मारुती बलेनो गाडी (क्र. एमएच एबी ८८०८)ची चोरी झाली. त्याच दिवशी सेक्टर २०मधून राखाडी कलरची स्विफ्ट डिझायर कार (क्र. एमएच ४६ एल ८७९२)चीसुद्धा चोरी झाली. या कार चोरीचा व्हिडिओ सीसीटीव्हीमध्ये कैद झाला, मात्र सीसीटीव्ही कॅमेरे समोर असलेल्या वेलपर्णीमुळे पोलिसांची डोकेदुखी वाढली आहे.

चोरट्यांचे अंधूक व अस्पष्ट चित्र कॅमेऱ्यांमध्ये कैद झाल्याने चोरट्यांना पकडावे कसे, असा प्रश्न तपास यंत्रणांसमोर उभा राहिला आहे. सदर व्हिडीओमध्ये कार चोरी करणारा चोरटा चोरी करण्याकरीता दुसऱ्या कारचा वापर करीत अवघ्या तीन ते चार मिनटात गाडीची काच तोडून चोरटा गाडी घेऊन पसार झाला.

## पामबीच मार्गावर अपघात; दोघे गंभीर जखमी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**


पामबीच मार्गावर कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयानजीक चौकात गुरुवारी (दि. १५) सकाळी साडेआठच्या इनोव्हा आणि सेलेनिओ गाडीचा अपघात झाला. या अपघातात दोन जण गंभीर तर तीन जण किरकोळ जखमी आहेत.

इनोव्हा चालकाला सेलेरिओने अचानक वळण घेतल्याने त्याचा ताबा सुटला व थेट नाल्यात गेली, तर सेलेरिओ गाडी थेट उलटली.

## उड्डाणपुलाच्या कामामुळे वाहतुकीत बदल

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सायन-पनवेल हायवे रोडवरील नेरूळ एलपी येथील उड्डाणपुलाच्या काँक्रिटीकरणाचे काम हाती घेण्यात आले आहे. या कामामुळे वाहतूक कोंडी होण्याची शक्यता असल्याने महामार्गालगतच्या एमआयडीसी सर्व्हिस रोडवरील एलपी जंक्शन ते शिरवणे ब्रिज अंडरपासपर्यंतचा रस्ता पुढील दोन महिने अवजड वाहनांसाठी बंद ठेवण्यात येणार आहे. याबाबत वाहनचालकांनी नोंद घेऊन सहकार्य करण्याचे आवाहनही नवी मुंबई वाहतूक पोलिसांकडून करण्यात आले आहे.



सायन-पनवेल हायवे रोडवरील एलपी नेरूळ उड्डाणपुलांच्या काँक्रिटीकरणाचे काम करण्यात येणार आहे. त्यामुळे नागरिकांमधून समाधान व्यक्त होत आहे. असे असले तरीदखील या उड्डाणपुलाच्या काँक्रीटीकरणाच्या कामामुळे वाहतूक कोंडी होण्याची शक्यता असून अपघाताचीही शक्यता आहे. यासाठी पुढील दोन महिने सायन-पनवेल हायवेलगतच्या एमआयडीसी सर्व्हिस रोडवरील एलपी जंक्शन ते शिरवणे ब्रिज अंडरपासपर्यंत जड, अवजड वाहनांना प्रवेश बंद करण्यात आला आहे.

या दरम्यान सायन-पनवेल महामार्गाच्या मुंबई लेनवरील अवजड वाहनांना उरण फाटा येथून एमआयडीसी रोडने फॉक्स व्हगन कटमार्गे तर पुणे लेनवरील वाहनासाठी शरयू मोटर्स येथून तसेच हर्डेलिया कंपनी येथील सर्व्हिस रोडने आयओसीएल कंगनीमार्गे इच्छित स्थळी जाण्यासाठी मार्ग नवी मुंबई वाहतूक विभागाकडून ठेवण्यात आला आहे.

याबाबत वाहनचालकांनी नोंद घेऊन सहकार्य करण्याचे आवाहनही नवी मुंबई वाहतूक पोलिसांकडून करण्यात आले आहे.

## गव्हाण विद्यालयात विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये पनवेल येथील आर. झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटलच्या वतीने इ. ५वी ते १२वी अखेरच्या विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी करण्यात आली.

आर.झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटलच्या मिशन रोशनी टीमने ही कौतुकास्पद कामगिरी केली. आय हॉस्पिटलच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांच्या डोळ्यांची मोफत तपासणी करून दृष्टीदोष असणाऱ्या विद्यार्थ्यांना मोफत चष्मे वाटप करण्यात येणार असल्याची माहिती नेत्र तपासणी शिबिराच्या समन्वयक डॉ. रोहिणी खाडे यांनी दिली. १३ व १४ डिसेंबर असे सलग दोन दिवस ही नेत्र तपासणी झाली. आर. झुनझुनवाला आय हॉस्पिटलच्या नेत्र तपासणी शिबिराच्या समन्वयक डॉ. रोहिणी खाडे यांच्यासह नेत्रतज्ज्ञ डॉ. सहेरिश मुल्ला, डॉ. सपना शर्मा आणि डॉ. श्रद्धा जाधव या नेत्रतज्ज्ञांच्या पथकाने विद्यार्थ्यांच्या डोळ्यांची तपासणी केली.

प्राचार्या साधना डोईफोडे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यालयाच्या आरोग्य विभागाचे प्रमुख एकनाथ ठाकूर यांनी नेत्रतपासणी शिबिराचे नेटके नियोजन केले. विद्यालयाचे उपप्राचार्य प्रमोद मंडले, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व समन्वय समिती सदस्यद्वय प्रमोद कोळी व रवींद्र भोईर यांचेसह अन्य शिक्षकांनी या शिबिरास भेट दिली.

## ट्रान्स हार्बर मार्गावरील जुईनगर रेल्वेस्थानकात तांत्रिक बिघाड

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

ट्रान्स हार्बर मार्गावरील जुईनगर रेल्वे स्थानकातील सिग्नल पॉईंटमध्ये तांत्रिक बिघाड झाला. गुरुवारी (दि. १५) सकाळी ११ ते १२.३० दरम्यान दीड तास प्रवाशांचा चांगलाच खोळंबा झाला होता.

ट्रान्स हार्बर मार्गावरील जुईनगर रेल्वे स्थानकानजीक सिग्नल पॉईंटमध्ये बिघाड झाल्याने काही वेळासाठी रेल्वेसेवा विस्कळीत झाली होती. या दरम्यानच्या एक ते दीड तास रेल्वेसेवा विस्कळीत झाल्याने प्रवाशांचा खोळंबा झाला होता. हार्बर मार्गवरील ट्रेन ही १५ ते २० मिनिटे उशिराने धावत होत्या, तर ट्रान्स हार्बर मार्गावरील वाशी, नेरूळ, पनवेल लोकल १५ मिनिटे उशिरा होत्या.



पनवेलहून येणाऱ्या ठाणे लोकल १०-१५ मिनीटे उशिरा येत होत्या, तर वाशीहून ठाणेच्या दिशेने जाणारी एक लोकल रद्द करण्यात आली. १२.१२ वा.ची ट्रेन १२.२८ला वाशी रेल्वेस्थानकात आली. दरम्यान अचानक काही वेळासाठी रेल्वे सेवा विस्कळीत झाल्याने प्रवाशांचा खोळंबा झाला होता.

## नवी मुंबई परिमंडळ क्षेत्रात पोलिसांच्या बदल्या

**पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबई परिमंडळ क्षेत्रातील पोलीस निरीक्षकांच्या सर्वसाधारण बदल्यांचे आदेश जाहीर झाले आहे. या संदर्भात अतितातडीने नऊ पोलीस निरीक्षकांच्या आणि २१ पोलीस कर्मचाऱ्यांच्या वाहतूक शाखेत बदलीचे आदेश जाहीर झाले आहेत. त्यानुसार अनेकांनी आपला पदभारही स्वीकारला आहे.

बदली झालेल्या पोलीस निरीक्षकांमध्ये महेश पाटील यांची तळोजा वाहतूक शाखेतून नेरूळ पोलीस ठाण्यात, सुनील कदम यांची तुर्भे स्थानकातून तळोजा वाहतूक शाखेत, सतीश जाधव यांची विशेष शाखेतून गुन्हे शाखेत, विमल विडये यांची खारघर पोलीस ठाण्यातून एपीएमसी वाहतूक शाखेत, संजय जोशी यांची पनवेल शहर पोलीस ठाण्यातून तुर्भे पोलीस ठाण्यात, पृथ्वीराज घोरपडे यांची एनआरआय पोलीस ठाण्यातून सीबीडी वाहतूक शाखेत, जगदीश शेरकर यांची सीबीडी वाहतूक शाखेतून पनवेल तालुका पोलीस ठाण्यात बदलीचे आदेश जाहीर झाले आहेत.

## पनवेल महापालिकेच्या स्वच्छ टेक्नॉलॉजी चॅलेंजमध्ये विविध महाविद्यालयांचे सादरीकरण

**पनवेल : प्रतिनिधी**

स्वच्छ टेक्नॉलॉजी चॅलेंज स्पर्धेमध्ये विविध महाविद्यालयांनी आपल्या प्रकल्पांचे सादरीकरण महापालिकेच्या मुख्यालयातील बैठक कक्षामध्ये सादर केले. गुरुवारी (दि. १५) झालेल्या या स्पर्धेमध्ये १० महाविद्यालयांनी सहभाग घेतला.

स्वच्छ भारत अभियानाची पनवेल महानगरपालिका हद्दीमध्य प्रभावीपणे अंमलबजावणी सुरू आहे. त्या अनुषंगाने विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव देण्याकरिता स्वच्छ टेक्नॉलॉजी चॅलेंज स्पर्धेचे आयोजन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे. या स्पर्धेमध्ये १० महाविद्यालयांनी सहभाग नोंदवला. आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शहर स्वच्छतेमध्ये हातभार लावण्याच्या उद्देशाने विविध नावीन्यपूर्ण प्रकल्पांचे सादरीकरण केले.



या वेळी उपायुक्त सचिन पवार, सहाय्यक आयुक्त डॉ. वैभव विधाते, कार्यकारी अभियंता संजय कटेकर, उप अभियंता विलास चव्हाण, घनकचरा आरोग्य विभागप्रमुख अनिल कोकरे यांच्यासह विविध इंजिनिअरींग कॉलेजचे प्रतिनिधी तसेच अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. पिल्लई इंजिनिअरींग कॉलेजने ‘स्वच्छता हर कदम’ हे स्वच्छतागृहांच्या ॲपचे निरीक्षण करणाऱ्या सादरीकरण केले, तसेच सरस्वती इंजिनिअरींग कॉलेजने प्लॅस्टिक पिशव्यांना पर्याय म्हणून कॉटन बॅग वेण्डिंग मशीन आणि प्लॅस्टिक बाटल्यांचे पुर्नवापर करून पेव्हर ब्लॉक तयार करणे, ३ आर पनवेल टिमने प्लास्टिक आईसी ॲप्लिकेशन सादर केले. अशा विविध प्रकल्पांचे सादरीकरण या वेळी करण्यात आले.

येत्या काही दिवसांनंतर भव्य दिव्य कार्यक्रमामध्ये या स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीस वितरीत करण्यात येणार आहे, तसेच या विजेत्यांनी तयार केलेले प्रकल्प केंद्र शासनाच्या स्पर्धेमध्ये स्वच्छ सर्वेक्षण स्पर्धेमध्ये पाठविण्यात येणार आहे. या विद्यार्थ्यांनी तयार केलेले प्रकल्प शहराच्या स्वच्छतेमध्ये तसेच प्लॅस्टिकचे प्रदूषण कमी करण्यामध्ये उपयोगी पडणार असल्याने येत्या काळात पनवेल महानगरपालिका पनवेल महापालिका कार्यक्षेत्रांमध्ये यातील काही प्रकल्प राबविणार आहे.

## झोपडपट्टी परिसराची डागडुजी करण्याची मागणी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई महापालिकेतर्फे स्वच्छता अभियानासाठी विविध स्तरावर विकासकामे व उपक्रम राबविण्यात येत आहेत. पदपथ आणि रस्त्यांची डागडुजी, संरक्षक भिंतीची रंगरंगोटी आदी कामे करण्यात येत आहे. असे असले तरी शहराचा प्रमुख भाग असलेल्या झोपडपट्टी परिसराकडे या अभियानांतर्गत दुर्लक्ष होऊ नये, अशी सूचना नवी मुंबई झोपडपट्टी विकास परिषदेचे अध्यक्ष प्रदीप वाघमारे यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांना एक पत्र दिले आहे.

स्वच्छ अभियानावर प्रत्येकवर्षी लाखो रुपये खर्च केले जातात, परंतु अनेकदा शहरातील झोपडपट्ट्यांकडे मात्र दुर्लक्ष होत असल्याचे दिसून आले आहे. झोपडपट्ट्या या नवी मुंबई शहराचा अविभाज्य घटक आहे. तेथील रहिवासीसुद्धा नवी मुंबईचे नागरिक आहेत. त्यामुळे विकास प्रक्रियेत त्यांनाही समान न्याय मिळायला हवा. शहरी भागाप्रमाणेच झोपडपट्ट्यांचा परिसरही सुंदर दिसायला हवा. विकासाची कामे केली जावीत, अशी मागणी वाघमारे यांनी केली आहे.

## नवी मुंबईत कायदा, सुव्यवस्था राखण्यासाठी पावले उचलणार -पोलीस आयुक्त मिलिंद भांबरे

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई पोलीस आयुक्त बिपिनकुमार सिंग यांची बदली झाली असून त्यांच्या जागी विशेष पोलीस महानिरीक्षक (कायदा सुव्यवस्था महाराष्ट्र) मिलिंद भारंबे यांची नियुक्ती झाली आहे. ज्येष्ठ नागरिक आणि महिला सुरक्षेवर अधिक भर देणार असून संघटित गुन्हेगारी आणि सायबर गुन्हेगारीवर अंकुश ठेवणार असल्याचे नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भांबरे यांनी सांगितले.



बुधवारी सायंकाळी मावळते आयुक्त बीपीनकुमार सिंग कडून त्यांनी पदभार स्वीकारला. आयुक्तांची बदली आणि नवीन आयुक्त कोण येणार या अनेक महिन्यांपासून नवी मुंबई पोलीस दलात सुरू असलेल्या चर्चेला पूर्णविराम मिळाला.

विशेष पोलीस महानिरीक्षक कायदा सुव्यवस्था विभागाचे मिलिंद भांबरे यांनी नवी मुंबई पोलीस आयुक्त म्हणून वर्णी लागली. बुधवारी त्यांनी पदभार स्विकारला. या वेळी पत्रकारांशी बोलताना त्यांनी शहरातील नागरिकांना हे शहर सुरक्षित वाटावे यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

ज्येष्ठ नागरिक आणि महिला सुरक्षेला प्राधान्य देणार असल्याचे सांगत त्यांनी संघटित गुन्हेगारीवर आळा घालणार असल्याची माहिती दिली.

सायबर गुन्हेगारीत होणारी वाढीबाबत त्यांनी चिंता व्यक्त करीत याबाबत ठोस उपाययोजना आणि जनजागृतीवर भर देणार असल्याचे सांगितले. हे शहर त्या मानाने शांत असले तरी वाढती व्हाइट कॉलर गुन्हेगारी, घरफोडी वाहन चोरी हे आव्हान असल्याचे सांगत हे आव्हान मोडून काढणार झल्याचा विश्वास व्यक्त केला आहे.

# माणगावमध्ये महामार्गालगत गटारासाठी निधी द्यावा

## सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांना निवेदन

**माणगाव : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गावरील कळमजे फाटा ते ढालघर फाटा या रस्त्याच्या दुतर्फा गटार बांधकाम करण्यात यावे. त्यासाठी अनुदान मंजूर करून हे काम लवकरात लवकर मार्गी लावावे, अशी मागणी स्थानिक ग्रामस्थांनी राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांच्याकडे बुधवार (दि.१४) निवेदनाद्वारे केली.

भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत माणगावचे नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, नगरपंचायतीचे पाणीपुरवठा सभापती राजेश मेहता, भाजपचे माणगाव शहर अध्यक्ष नितीन दसवते, जिल्हा भाजप युवा मोर्चाचे उपाध्यक्ष चिन्मय मोने यांनी बुधवारी राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांची पनवेल येथे भेट घेतली व त्यांना



मागणीचे निवेदन दिले.

मुंबई-गोवा महामार्गावर सतत होणारी वाहतूक कोंडी लक्षात घेता रस्ता रुंदीकरण करून महामार्गाच्या दुतर्फा गटार बांधकाम करणे आवश्यक आहे. माणगाव शहराचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे. नोकरी-धंद्यानिमित्त या ठिकाणी येणारे लोक स्थायिक होताना दिसत आहेत. दर शनिवार, रविवार आणि सुट्टीच्या दिवसात अनेक पर्यटक हरिहरेश्वर, श्रीवर्धन, दिवेआगर याठिकाणी जातात, त्यांना माणगाववरून जावे लागते. त्यावेळी माणगाव परिसरात वाहतूक कोंडी होऊन वाहन चालक, नागरिक, प्रवासी यांचा वेळ वाया जातो. वाहतूक पोलिसांनाही वाहतूक सुरळीत करण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागते. माणगावात वाहतूक कोंडीचा प्रश्न नित्याचाच झाला आहे. यासाठी मुंबई-गोवा महामार्गावरील कळमजे फाटा ते ढालघर फाटा या दोन किमी अंतरावर रस्त्याच्या दुतर्फा गटार बांधकाम करण्यात यावे, त्यासाठी अनुदान मंजूर करून हे काम लवकरात लवकर मार्गी लावावे, अशी मागणी मंत्री रवींद्र चव्हाण यांना दिलेल्या निवेदनात करण्यात आली आहे.

# ग्रामपंचायत निवडणुकीसाठी रोह्यात प्रशासनही होतेय सज्ज

**रोहे : प्रतिनिधी**

तालुक्यातील पाच ग्रामपंचायतींच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली असून, तेथे थेट सरपंच पदासाठी एकूण १२ उमेदवार नशीब आजमावत आहेत. येत्या रविवारी (दि. १८) या ग्रामपंचायतीसाठी मतदान असून मंगळवारी मतमोजणी आहे. त्यासाठी निवडणूक प्रशासनासह पोलीस यंत्रणा सज्ज झाली आहे. तहसीलदार कविता जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली निवडणूक प्रक्रिया चालू असून प्रशिक्षणासह अन्य नियोजन सुरू आहे.

रोहा तालुक्यातील तळवली तर्फे अष्टमी, खैरे खुर्द, पुई, पहूर आणि दापोली या पाच ग्रामपंचायतीची निवडणूक रविवारी होत असून, येथील थेट सरपंच पदाच्या पाच जागांसाठी बारा तर ग्रामपंचायत सदस्य पदाच्या एकूण ३७ जागांसाठी ६७ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

रोहा तहसीलदार कविता जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली या पाच ग्रामपंचायतीच्या निवडणुका सुरळीत पार पाडण्यासाठी प्रशासन सज्ज झाले आहे.

या पाच ग्रामपंचायतीसाठी १८ मतदान केंद्रप्रमुख, १८ सहाय्यक केंद्रप्रमुख असे एकूण ३६ मतदानाधिकारी व १८ शिपाई नियुक्त करण्यात आले आहेत. यासह राखीव अधिकारीही सज्ज ठेवण्यात आले आहेत. त्यांना ६ व १३ डिसेंबर रोजी प्रशिक्षण देण्यात आले.

निवडणूक होत असलेल्या पाच ग्रामपंचायतींच्या हद्दीत शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी रोहा व कोलाड पोलीस ठाणे सज्ज झाले आहे. रोहा पोलीस ठाण्याअंतर्गत खैरे खुर्द व दापोली ग्रामपंचायत येत असून तेथे निरीक्षक प्रमोद बाबर यांच्या मार्गदर्शनाखाली एकूण २५ पोलीस कर्मचारी तैनात करण्यात येणार आहेत. तर कोलाड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील तळवली तर्फे अष्टमी, पुई आणि पहूर तीन ग्रामपंचायतींच्या निवडणुका होत असून तेथे सहाय्यक निरीक्षक अजित साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली एकूण ३० पोलीस कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात येणार आहे. सध्या हे पोलीस कर्मचारी गस्त घालत आहेत.

# महिलांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यात शिक्षणाची भूमिका महत्त्वाची -मृदुला गडणीस

## कर्जतमध्ये महिला सक्षमीकरण कार्यक्रम



**कर्जत : प्रतिनिधी**

भारताच्या अनेक भागांमध्ये अजूनही पुरुष आणि स्त्रियांसाठी भिन्न सामाजीक मानदंड आहेत. मात्र या भेदभावपूर्ण वागणुकीमुळे अनेक सामाजिक समस्या निर्माण झाल्या आहेत. महिलांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यात शिक्षणाची भूमिका महत्त्वाची आहे, असे प्रतिपादन लेखिका व संस्कृतच्या अभ्यासक मृदुला गडणीस यांनी कर्जत येथे केले.

कोकण ज्ञानपीठाच्या कर्जत येथील राहुल धारकर फार्मसी महाविद्यालयाच्या वतीने महिला तक्रारी आणि लैंगिक छळ निवारण समितीने 'पॉश कायदा २०१३' प्रभावीपणे लागू करण्यासाठी महिला सक्षमीकरण कार्यक्रमाचे आयोजन केले होते. त्याचे उद्घाटन मृदुला गडणीस यांच्या हस्ते करण्यात आले. त्या वेळी मृदुला गडणीस बोलत होत्या. महिलांच्या प्रतिष्ठेला बाधा पोहोचवणाऱ्या प्रथांचा त्याग करणे हे प्रत्येक नागरिकाचे मूलभूत कर्तव्य आहे, असे त्यांनी या वेळी सांगितले.

योग्य शिक्षणा सोबतच सामाजिक भान, कुटुंबातील साक्षरता, नैतिकता, अध्यात्म, पवित्रता, योग्य विचार आणि योग्य आचरण महिलांवरील भेदभाव आणि हिंसाचार रोखण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. विद्यार्थ्यांनी वाचन आणि प्रवास यावर भर दिला ज्यामुळे आपली विचार प्रक्रिया बदलण्यास मदत होईल, असे गडणीस म्हणाल्या.

प्राचार्य प्राचार्य डॉ. मोहन काळे यांनी प्रास्ताविकात महाविद्यालयाचा चढता आलेख सादर केला. सूत्रसंचालन प्रा. ज्योती लहाने यांनी केले. महाविद्यालयीन विकास समिती सदस्य विजय मांडे, व्यक्ती विकासचे व्याख्याते नितीन पाटील, डॉ. भरत टेकाडे, प्रा. मनीषा चौधरी, प्रा. अमोल बोराडे, प्रा. तनिष्का ठाकरे, रेवती देशपांडे यांच्यासह शिक्षक आणि विद्यार्थी या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माणगाव उपजिल्हा रुग्णालयात कंत्राटी कामगारांवर अन्याय

## स्वयंपाकगृहातील दोन महिलांची उपविभागीय अधिकाऱ्यांकडे तक्रार

**माणगाव : प्रतिनिधी**

येथील उपजिल्हा रुग्णालयातील कंत्राटी कामगारांवर गेली अनेक वर्षे अन्याय होत असून त्यांना कामाचा योग्य तो मोबदलादेखील दिला जात नाही. यावर आवाज उठविण्याचा प्रयत्न केला असता त्यांना कामावरून काढून टाकण्याची धमकी दिली जाते. या उपजिल्हा रुग्णालयाच्या स्वयंपाक गृहातील बबिता गायकवाड व सुषमा महाडीक यांनी त्यांच्यावर झालेल्या अन्यायाबाबत माणगावचे उपविभागीय अधिकारी उमेश बिरारी व नगराध्यक्ष ज्ञानदेव पोवार यांच्याकडे तक्रारी अर्ज देऊन दाद मागितली आहे.

माणगाव उपजिल्हा रुग्णालयात उपचार घेणाऱ्या रुग्णांना, गरोदर मातांना आहार सेवा पुरविली जाते. या आहार सेवेचा ठेका पालघर येथील एका कंत्राटदाराला मिळाला आहे.



प्रत्यक्षात मात्र या ठिकाणी दुसरीच व्यक्ती हे कंत्राट पाहत असल्याचे दिसते. या ठिकाणी आहार सेवा देण्यासाठी स्वयंपाकगृहात चार सेविका व एक सुपरवायझर काम करीत होते. मात्र आता दोनच सेविका काम करीत आहेत. बबिता गायकवाड व सुषमा महाडिक या २००४ पासून येथे रुग्णांना आहार सेवा देण्याचे काम करीत होत्या. मात्र जुलै २०२० मध्ये बबिता गायकवाड व सुषमा महाडिक यांना संबंधित सब ठेकेदार यांनी सांगितले की, तुम्ही काही दिवस सुट्टी घ्या. काही दिवसांनंतर तुम्हाला पुन्हा कामावर घेण्यात येईल. काही दिवसांनंतर त्या संबंधित सब ठेकेदारास कामासाठी विचारण्यास गेल्या असता त्यांना उडवाउडवीची उत्तरे देण्यात आली. फोन केले असता अपमानास्पद वागणूक देत आता त्यांचे फोनसुद्धा सबठेकेदार उचलत नाही.

उपजिल्हा रुग्णालय २००४पासून सफाई, आहार, धुलाई व सुरक्षा रक्षक या सेवा कंत्राटदारांमार्फत देण्यात येत आहेत. तालुक्याबाहेरील कामगार आणून संबंधित ठेकेदारांने स्थानिक कामगारांवर अन्याय व त्यांची हेळसांड केली. याबाबतीत माणगांवचे नगराध्यक्ष ज्ञानदेव पोवार व डॉ. संतोष कामेरकर यांनी संबंधित ठेकेदाराला खडसावले असता संबंधित सबठेकेदारांने काही दिवसांत या कर्मचाऱ्यांना पुन्हा कामावर घेण्याचे मान्य केले होते. परंतु, आजतागायत त्या कामगारांना कामावर परत घेतलेच नाही.

बबिता गायकवाड व सुषमा महाडिक यांनी बोलताना सांगितले की, उपजिल्हा रुग्णालयात अल्प वेतनात काम करण्यात आमचे अर्धे आयुष्य गेले. आम्हाला अचानक कामावरून काढल्यामुळे आमच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे कठीण झाले आहे. त्यामुळे आमच्यावर झालेल्या अन्याय दूर करून आम्हाला न्याय मिळावा व परत कामावर रुजू करण्यात यावे, अशी मागणी आम्ही केली आहे.

उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक गोमसाळे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, मी आताच बदली होऊन येथे रुजू झालो असून मला याबाबतीत काही माहिती नाही. पालघर येथील मुख्य कंत्राटदार चांदणे यांच्याशी संपर्क साधला असता, मी चौकशी करतो. याबाबत मला काहीही माहीत नाही.

# पेणमध्ये मानवी हक्क दिन उत्साहात




**पेण : प्रतिनिधी**

माणसाने मानवी देह, इभ्रत याची जपणूक करणे म्हणजे मानवाधिकार होय. जागृतपणे जगा, मानवाधिकार आपोआप जोपासले जातील, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ सदानंद धारप यांनी पेण येथे केले.

पेण एज्युकेशन सोसायटीच्या भाऊसाहेब नेने कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयात नुकताच आंतरराष्ट्रीय मानवी हक्क दिवस साजरा करण्यात आला. त्या निमित्त आयोजित केलेल्या कार्याक्रमात प्राचार्य डॉ सदानंद धारप बोलत होते.

मानवी हक्क दिनाचे औचित्य साधुन प्रा. देवीदास शिवपुजे यांचे 'मानवाधिकाराचे महत्व' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. प्रा. शिवपुजे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मरण करत त्यांना शब्दरूपी आदरांजली वाहिली.

माणूस म्हणून जगताना आपल्यातील क्षमतांचा विकास करत माणसाने माणसाशी माणुसकीने वागत स्वत:मधील माणूस जपण्याचा प्रयत्न करावा व दुसऱ्याच शुभ चिंता म्हणजे आपोआप तुमचं भलं होईल, असे प्रा. शिवपुजे यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थी प्रतिनिधी कीर्ती उके हिने केले. महाविद्यालयातील प्राध्यापक आणि विद्यार्थी या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सायमा मुजावर हिन आभार मानले.

# श्रीवर्धनमध्ये 'जिओ'चे नेटवर्क गायब, ग्राहक त्रस्त

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

मागील चार-पाच दिवसांपासून श्रीवर्धन परिसरामध्ये जिओ मोबाईलचे नेटवर्क वारंवार गायब होत असल्यामुळे ग्राहकांमधून मोठ्या प्रमाणात संताप व्यक्त केला जात आहे.

श्रीवर्धन शहरामध्ये काही वर्षांपूर्वी आयडिया आणि वोडाफोन, बीएसएनएल इत्यादी नेटवर्क उपलब्ध होते. रिलायन्स जिओने आपली मोबाइल सेवा सुरू केल्यानंतर श्रीवर्धनमधील ग्राहकांना चांगली सेवा मिळू लागली होती. जिओ मोबाइलची फोरजी सेवा सुरू झाल्यानंतर अनेक ग्राहकांनी आपले मोबाईल बदलून जिओ कंपनी वरती पोर्ट केले होते.

श्रीवर्धन शहरासह परिसरातील बहुतांश भागांमध्ये जिओचे नेटवर्क चांगले चालत असल्याने नेटकऱ्यांनादेखील नेट वापरणे सोयीचे झाले होते. विविध बँकांमधील नेटवर्क खराब झाल्यानंतरदेखील जिओच्या नेटवर्कवर बँकांचे कामकाज चालू राहत होते. मात्र मागील चार-पाच दिवसांपासून जिओ मोबाइलचे नेटवर्क वारंवार गायब होत असून, दिवसातून आठ ते दहा तास नेटवर्क बंद राहत आहे. त्यामुळे जिओचे सिम वापरणाऱ्या ग्राहकांमधून संताप व्यक्त केला जात आहे.

# आपदा मित्रांचे महाडमध्ये आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिर

**अलिबाग : जिमाका**

राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण-नवी दिल्ली यांच्याकडून राज्यातील २० जिल्ह्यामध्ये आपदा मित्रांची निवड करून त्यांना प्रशिक्षण देण्यासाठी योजना तयार करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या पुढाकाराने रायगड जिल्ह्यातून ३०० आपदा मित्रांच्या प्रशिक्षणाचे नियोजन करण्यात आले आहे. त्यापैकी पहिल्या ५० जणांच्या तुकडीच्या १२ दिवसांच्या प्रशिक्षण वर्गास मंगळवारी (दि. १३) महाड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात सुरुवात झाली.

या आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन महाड प्रांताधिकारी प्रतिमा पुदलवाड यांच्या हस्ते झाले. तहसीलदार सुरेश काशिद, नायब तहसीदार काशिनाथ तिरमिळे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सागर पाठक, नागरी संरक्षण दलाचे सहाय्यक उपनियंत्रक शशिकांत शिरसाट, काशिनाथ कुरकूटे, समाधान कडू, गणेश पाटील यावेळी उपस्थित होते.

रायगड जिल्ह्यात नैसर्गिक व मानव निर्मित आपत्तींमध्ये होत असलेली वाढ पाहता आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षणाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. या प्रशिक्षणाच्या माध्यमातून आपदा मित्रांना आपत्ती व्यवस्थापनाचे, आपत्तीकाळात व आपत्तीनंतरच्या काळात करावयाच्या उपाययोजना व मदतकार्याविषयीचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. वय १८ ते ४० वर्षे असलेल्या या प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षित करण्यासाठी हे तब्बल १२ दिवसांचे निवासी शिबिर आयोजित करण्यात आले आहे. या प्रशिक्षणार्थींना लाईफ जॅकेट, बॅटरी, दोरखंड तसेच आपत्ती व्यवस्थापनांतर्गत मदतकार्यासाठी आवश्यक असणाऱ्या इतर वस्तूंचे एकत्रित किट देण्यात आले आहे.

आपदा मित्रांनी प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांना प्रशिक्षण प्रमाणपत्र दिले जाणार असून त्यांचा पाच लाख रुपयांचा अपघाती विमा उतरविण्यात येणार आहे.

# फणसाड अभयारण्याकडे पर्यटकांची पाठ

## सुविधा व जाहिरातीअभावी पर्यटनस्थळ बहरेना!

**मुरुड : प्रतिनिधी**

नयनरम्य निसर्ग आणि वन्यजीवांचा समृद्ध असा अनमोल ठेवा असूनही फणसाड अभयारण्याला पर्यटकांचा अपेक्षित प्रतिसाद मिळत नाही. सुविधा व जाहिरातबाजी न केल्यामुळे या अभयारण्यात पर्यटक येण्याचे प्रमाण घटले आहे. पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी ठिकठिकाणी माहिती केंद्रे सुरु केली आणि विविध सेवा उपलब्ध करून दिल्यास फणसाड अभयारण्यात पर्यटकांचा राबता वाढेल, असे निसर्गप्रेमींचे म्हणणे आहे.

मुरुड तालुक्यातील सुपेगाव परिसरातील सुमारे ५४ किमी चौरस क्षेत्रात फणसाड अभयारण्य विस्तारले असून जैवविविधतेने समृद्ध अशा या अभयारण्यात विविध पक्षी, प्राणी व इतर वन्यजीव यांचा वैज्ञानिकदृष्ट्या अभ्यास होत असून त्यांचे योग्य संवर्धन वन विभागातर्फे केले जात आहे. या अभयारण्यात १७ प्रजातींचे साप, १२ उभयाचर प्राणी, १६ सस्तन प्राणी, २५ प्रजातींचे कोळी, १४ सागरी जीव, तब्बल १३२ प्रजातींची फुलपाखरे तसेच १९ प्रकारचे वन्यप्राणी, ज्यामध्ये बिबट्या, सांबर, भेकर, रानगवे आणि रानकुत्र्यांचा समावेश आहे.

फणसाड अभयारण्याची वेळ सकाळी ७ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत असून, ज्यांना पायी फिरणे शक्य नाही अशांना प्रति तीन किमी २५० रुपये देऊन बैलगाडीतून सफर करण्याची सोय आहे. बचत गटातर्फे शाकाहारी, मांसाहारी भोजन, चहा, नास्त्याचीदेखील व्यवस्था करण्यात आली असून मुक्कामासाठी



चांगल्या दर्जाचे टेंट व कॉमन रुम्सही अल्पदरात उपलब्ध आहेत. नितांत निसर्ग सुंदर परिसर असूनही फणसाड अभयारण्यात शनिवारी, रविवारी व सुटीच्या दिवशी जेमतेम १०० ते १२५ पर्यटक येतात.

पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी वन विभागाने तालुक्यातील काशिद, नांदगाव, मुरुड, आगरदांडा, शिघ्रे नाका व उसरोली टेप या ठिकाणी आकर्षक माहिती फलक लावावेत तसेच फणसाड अभयारण्याविषयी माहिती देणारी केंद्रे सुरु करावीत, असे निसर्गप्रेमींचे म्हणणे आहे.

फणसाड अभयारण्यात येणाऱ्या पर्यटकांना इथली जैवविविधता निश्चितपणाने आवडते. सर्वे गावाजवळ फणसाड अभयारण्यात येण्यासाठी प्रवेशद्वार उघडले जाणार असून तेथे नामफलकही लावण्यात येणार आहे. त्यामुळे काशिद बीच व जंजिरा किल्ल्यावर जाणाऱ्या पर्यटकांना फणसाड अभयारण्य पाहता येईल, आणि स्थानिकांना शाश्वत रोजगार मिळेल असा विश्वास फणसाड अभयारण्य वनपरिक्षेत्र अधिकारी तुषार काळभोर यांनी व्यक्त केला, मात्र मागील दोन वर्षांपासून सर्वे येथील प्रवेशद्वार तयार करण्यात आलेले नाही.

फणसाड अभयारण्य फिरण्यासाठी बॅटरीवर चालणाऱ्या जिप्सी गाड्यासुद्धा येथे उपलब्ध करून देण्यात आलेल्या नाहीत. त्याबाबतचा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयाकडे पाठविला असल्याचे, अभयारण्य प्रशासनाकडून सांगण्यात येते. मात्र त्याला पाचपेक्षा जास्त वर्षे होऊनही बॅटरीवर चालणाऱ्या गाड्या अभयारण्यात आलेल्या नाहीत.

पर्यटकांसाठी विविध सेवा पुरवाव्यात अशी मागणी वन्यजीव प्रेमींकडून करण्यात येत आहे. पर्यटक वाढले तर फणसाड प्रशासनाला मोठा महसूल मिळणार आहे. परंतु अधिकारी पाठपुरावा नसल्याने येथील आवश्यक असणाऱ्या बाबींची पूर्तता होत नसल्याचे दिसून येत आहे. अभयारण्याच्या स्थापनेला अनेक वर्ष होऊन गेली मात्र प्रसिद्धीसाठी कोणताही निधी खर्च करण्यात आलेला नाही. त्यामुळे पर्यटकांची गर्दी खेचण्यात हे अभयारण्य अपयशी ठरले आहे.

# मोरोक्कोला नमवून फ्रान्स फायनलमध्ये



**अल खोर (कतार) : वृत्तसंस्था**

**थिओ हर्नांडिझ आणि रॅण्डल कोलो मौनी या दोघांनी केलेल्या गोल्सच्या जोरावर फ्रान्सने फिफा विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात प्रवेश केला आहे. मोरोक्कोचा बचाव भेदण्यात फ्रान्सला पाचव्या मिनिटालाच यश आले. यानंतर मोरोक्कोला सामन्यात पुनरागमन करताच आले नाही. फ्रान्सने सलग दुसऱ्यांदा विश्वचषक स्पर्धेची अंतिम फेरी गाठली आहे.**

फ्रान्सने पाचव्या मिनिटापासूनच आक्रमक खेळ सुरू केला. अँटोइन ग्रिजमनने काइलियन एमबाप्पेला केले पास एमबाप्पेने डाव्या पायाने गोलपोस्टवर धाडला, मात्र हा गोल वाचवण्यात मोरोक्कोला यश आले. त्याच मिनिटाला थिओ हर्नांडिझने सहा यार्ड बॉक्समधून मारलेला चेंडू नेटच्या डाव्या कॉर्नरमध्ये जाऊन विसावला आणि फ्रान्सला १-०ची आघाडी मिळाली. मोरोक्कोनेही अनेकदा प्रयत्न केले मात्र त्यांना यश आले नाही.

मोरोक्को संघ शनिवारी (दि. १७) तिसऱ्या स्थानासाठीच्या लढतीत क्रोएशियाविरुद्ध खेळणार आहे.

### अर्जेंटिनाशी अंतिम लढत

*विद्यमान विश्वविजेता असलेला फ्रान्स संघ अर्जेंटिनाविरुद्ध अंतिम सामन्यासाठी मैदानात उतरणार आहे. फ्रान्सने सलग दुसऱ्यांदा विश्वचषक स्पर्धेची अंतिम फेरी गाठली आहे. २००२नंतर फ्रान्स हा पहिला असा संघ ठरला आहे ज्याने सलग दोन विश्वचषक स्पर्धांमध्ये अंतिम सामन्यात प्रवेश मिळवला आहे. यापूर्वी २००२मध्ये ब्राझीलने ही कामगिरी केली होती. अंतिम सामन्यात दोन वेळा विश्वविजेत्या ठरलेल्या अर्जेंटिनाचा संघ लिओन मेस्सीच्या नेतृत्वाखाली जिंकणार की फ्रान्स आपली मक्तेदारी कायम राखणार याकडे चाहत्यांचे लक्ष लागले आहे. ही महालढत १८ डिसेंबर होणार आहे.*





## कुलदीप-सिराजच्या भेदक गोलंदाजीपुढे
# बांगलादेशची घसरगुंडी
### दुसऱ्या दिवसाखेर २७१ धावांनी पिछाडीवर

**चट्टोग्राम : वृत्तसंस्था**

बांगलादेशविरुद्धच्या सामन्यात भारताने आपल्या पहिल्या डावात ४०४ धावा केल्यानंतर बांगलादेशच्या पहिल्या डावात दुसऱ्या दिवसाच्या समाप्तीपर्यंत ४४ षटकांत ८ बाद १३३ धावा केल्या आहेत. त्यामुळे बांगलादेश संघ अजूनही २७१ धावांनी पिछाडीवर असल्याने अडचणीत सापडला आहे.



झहूर अहमद चौधरी स्टेडियमवर सुरू असलेल्या या सामन्यातील दुसऱ्या दिवशी बांगलादेश संघाला पहिला धक्का नजमुल हुसेन शांतोच्या रूपाने बसला. तो संघाचे आणि स्वत:चे खाते उघडण्याअगोदर बाद झाला. त्याच्यापाठोपाठ यासिर अलीदेखील ४ धावा काढून बाद झाला. त्यामुळे बांगलादेश संघ अडचणीत आला. त्यानंतर २४.२ षटकात बांगलादेशचा निम्मा संघ तंबूत परतला होता. तेव्हा संघाची धावसंख्या ७५ अशी होती. दरम्यान यानंतर ही संघाची पडझड सुरु राहिल्याने संघ दबावात सापडला.

बांगलादेशकडून फलंदाजी करताना मुशफिकर रहीमने सर्वाधिक धावा केल्या. त्याने ५८ चेंडूत तीन चौकारांच्या मदतीने २८ धावा केल्या. त्याचबरोबर लिटन दास (२४) आणि झाकिर हसनने (२०) थोड्या प्रमाणात धावा केल्या, मात्र इतर चार फलंदाजांना दोन आकडी धावसंख्यासुद्धा पार करता आली नाही.

दुसऱ्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा मेहदी हसन १६ आणि इबादोत हुसेन १३ धावांवर नाबाद आहे. भारतीय संघाकडून गोलंदाजी करताना फिरकीपटू कुलदीप यादवने सर्वाधिक चार विकेट्स घेतल्या. त्याचबरोबर मोहम्मद सिराजने दुसऱ्या बाजूने वेगवान मारा सुरुच ठेवताना तीन गडी बाद केले, तर उमेश यादवने एकाला तंबूत पाठविले.

**अश्विनचे अर्धशतक**

दुसऱ्या दिवशी श्रेयस अय्यरने ८६ धावांची शानदार खेळी करून बाद झाला. त्याने १९२ चेंडूंचा सामना करताना १० चौकार लगावले. त्यानंतर भारतीय संघाला रविचंद्रन अश्विन आणि कुलदीप यादव या जोडीने तारले. या दरम्यान अश्विनने अर्धशतक पूर्ण केले. त्याने १०३ चेंडूंचा सामना करताना दोन चौकार आणि दोन षटकारांच्या मदतीने नाबाद ५७ धावा केल्या. कुलदीपने त्याला सुरेख साथ दिली. त्याने १०० चेंडूंत ३३ धावा केल्या आहेत. या जोडीने आठव्या विकेट्ससाठी ७९ धावांची भागीदारी केली व बांगलादेशच्या गोलंदाजांना झुंजविले.

## अय्यरने टाकले विराट, सूर्याला मागे
### यंदा सर्व फॉरमॅटमध्ये भारतासाठी सर्वाधिक धावा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारत आणि बांगलादेश संघात पहिला कसोटी सामना खेळला जात आहे. या कसोटी सामन्याच्या दुसऱ्या दिवशी पहिल्या डावात ४०४ धावांचा डोंगर उभारला. भारतीय संघाकडून चेतेश्वर पुजारा आणि श्रेयस अय्यरने सर्वाधिक धावांचे योगदान दिले. अय्यरने अर्धशतक झळकावताना विराट कोहली आणि सूयकुमार यादवला मागे टाकताना एक खास पराक्रम केला आहे.



श्रेयस अय्यरने बांगलादेशविरुद्ध पहिल्या डावाच ८६ धावांची शानदार खेळी केली. त्याने आपल्या खेळीत १९२ चेंडूंचा सामना करताना १० चौकार लगावले. दरम्यान, अय्यरने सूर्यकुमार यादव आणि विराट कोहली यांसारख्या सहकारी फलंदाजांना मागे टाकले आहे. तो २०२२मध्ये खेळाच्या सर्व फॉरमॅटमध्ये भारतासाठी सर्वाधिक धावा करणारा खेळाडू ठरला आहे.

अय्यरने या वर्षी आतापर्यंत ३८ डावांमध्ये १४८९ धावा केल्या आहेत, ज्यासह त्याने सूर्यकुमार यादवला २०२२मध्ये भारतासाठी खेळाच्या सर्व फॉरमॅटमध्ये सर्वाधिक धावा करणारा खेळाडू म्हणून मागे टाकले आहे. या यादीत विराट कोहली (१३०४) तिसऱ्या स्थानावर, ऋषभ पंत (१२७८) चौथ्या स्थानावर आणि कर्णधार रोहित शर्मा (९९५) पाचव्या स्थानावर आहे.

## जिल्हास्तरीय वेटलिफ्टिंग स्पर्धेत ‘हिरवळ’च्या जितेशला सुवर्णपदक

**माणगाव : प्रतिनिधी**

नेरळ येथे नुकत्याच झालेल्या जिल्हास्तरीय वेटलिफ्टिंग स्पर्धेत हिरवळ एज्युकेशन ट्रस्टच्या ज्युनिअर कॉलेज ऑफ आर्टस् कॉमर्स ॲण्ड सायन्स इंग्रजी माध्यमातील विद्यार्थी जितेश चव्हाण याने सुवर्णपदक जिंकले. त्यामुळे त्याची विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

याबद्दल हिरवळ संस्थेचे अध्यक्ष किशोर धारिया, संचालिका सोनाली धारिया तसेच प्रमुख सल्लागार डॉ. संध्या कुलकर्णी यांनी जितेश चव्हाणचे कौतुक करून त्याला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. त्याचप्रमाणे कॉलेज ऑफ सीएसआयटीचे प्रा. सुदेश कदम, ज्युनियर कॉलेजच्या प्राचार्य विद्या गुजर, हिरवळ रात्र महाविद्यालयचे प्रा. राकेश वडवलकर, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी जितेशचे अभिनंदन केले.



**खोपोली : रायगड जिल्हा १४ वर्षाखालील मुलांच्या क्रिकेट संघाच्या कर्णधारपदी येथील अथर्व नितेश पाटील याची निवड झाली आहे. त्याबद्दल रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष चंद्रकांत मते यांनी अथर्वचे त्याच्या निवासस्थानी जाऊन अभिनंदन केले.** (छाया : विनायक माडपे)

## जिल्हा कबड्डी चषक स्पर्धेत रायवाडी, पनवेल संघ विजेते

**अलिबाग : प्रतिनिधी**

जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या संकल्पनेतून आणि मार्गदर्शनाखाली बुधवारी (दि.१४) अलिबाग वेश्वी येथील पीएनपी महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशन यांच्या तांत्रिक सहकार्याने रायगड जिल्हा प्रशासनाकडून कबड्डी चषक स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत पुरुष गटात पांडवादेवी रायवाडी, तर महिलांमध्ये कर्नाळा स्पोर्ट्स पनवेल यांनी बाजी मारली.





जिल्हाधिकारी डॉ. कल्याणकर यांच्या हस्ते विजेत्या संघांना बक्षीस वितरण करण्यात आले. पारितोषिक वितरण समारंभास अपर जिल्हाधिकारी अमोल यादव, उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) सर्जेराव म्हस्के-पाटील, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, अलिबाग प्रांताधिकारी प्रशांत ढगे, जिल्हा प्रशासन अधिकारी श्याम कोशेट्टी, तहसीलदार विशाल दौंडकर, डॉ. सतिश कदम, केदार शिंदे, जगन्नाथ वरसोलकर तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी, पीएनपी महाविद्यालयाचे विद्यार्थी, कर्मचारी आदी उपस्थित होते.

या वेळी अतिरिक्त जिल्हाधिकारी यादव यांनी आणि अतिरिक्त पोलीस अधीक्षक झेंडे यांनी खेळाडूंना प्रोत्साहन देत मार्गदर्शन केले. खेळाडूंनीही या स्पर्धेविषयी आपले मनोगत व्यक्त केले.

स्पर्धेतील प्रावीण्यप्राप्त संघांना आकर्षक चषक, प्रमाणपत्र आणि रोख पारितोषिक देण्यात आले.

स्पर्धा यशस्वी करण्याकरिता रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनचे तांत्रिक अधिकारी आणि स्पर्धा प्रमुख जनार्दन पाटील, जे.जे. पाटील, पीएनपी महाविद्यालयाचे क्रीडा शिक्षक श्री. म्हात्रे, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाचे क्रीडा अधिकारी सचिन निकम, सिद्धार्थ खंडागळे, प्रफुल्ल, सुरेंद्र, अमित, पीएनपी महाविद्यालयाचे खेळाडू स्वयंसेवक, खेळाडूंना वैद्यकीय सुविधा देणारे अलिबाग जिल्हा सामान्य रुग्णालयातील डॉ. आशिष मिश्रा, डॉ. अजित बरगे व त्यांचे सहकारी आदी सर्वांचे सहकार्य लाभले.

### स्पर्धेचा गटनिहाय निकाल

**महिला गट : प्रथम कर्नाळा स्पोर्ट्स पनवेल, द्वितीय भिल्लेश्वर क्रीडा मंडळ, किहीम, अलिबाग, तृतीय टाकदेवी क्रीडा मंडळ मांडवा व दत्तात्रेय स्पोर्ट्स पनवेल**

**पुरुष गट : प्रथम पांडवादेवी रायवाडी, अलिबाग, द्वितीय ज्ञानेश्वर कोळवे, पेण, तृतीय बजरंग रोहा व मरीदेवी, धेरंड, अलिबाग.**

## नवी मुंबईच्या प्रतीक्षाची परदेशात ‘सुवर्ण’ कामगिरी



**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्राची कन्या करावे गावची रहिवासी प्रतीक्षा शिगवण हिने न्यूझीलंडमध्ये झालेल्या कॉमनवेल्थ चॅम्पियनशिपमध्ये पॉवरलिफ्टिंग क्रीडा प्रकारात सुवर्णपदक पटकाविले. या स्पर्धेत १५ देशांतील खेळाडू सहभागी झाले होते.

परदेशात झालेल्या स्पर्धेत सहभाग घेऊन ‘सुवर्ण’ कामगिरी केल्याबद्दल करावे गावचे माजी नगरसेवक विनोद म्हात्रे यांनी प्रतीक्षाचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. त्यांच्यासमवेत प्रतीक्षाचे पती प्रवीण शिगवण, अभिमन्यू म्हात्रे आदी उपस्थित होते.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com